# प्रकरण चौथे

## " ' अयोनिजा ' - आशय व अभिव्यक्तीदृष्टया विचार. "

प्रास्ताविक :

वि. शं. पारगांवकर यांची 'अयोनिजा' ही द्रौपदी या प्रमुख व्यक्तिरेखेवर आधारलेली कादंबरी म्हणजे द्रौपदीच्या जीवनाचा एक शोध घेण्याचा प्रयत्न आहे. हिच्या अलौकिक व्यक्तिमत्वामुळे पारगांवकर अत्यंत प्रभावित झालेले आहेत. तिच्या जीवनाच्या अनेक पैलूंचे यथाशक्ती दर्शन घडवावे या हेतूने त्यांनी ही कादंबरी लिहिली आहे.

महाभारत हा एक अलौकिक ग्रंथ असून त्या ग्रंथाचा प्रभावही पारगांवकरांच्या मनावर झालेला दिसतो. महाभारतातील पांडवांच्या जिवनाशी पत्नी म्हणून निगडीत असल्यामुळे द्रौपदीला पांडवांच्या जीवनात जितके महत्व आहे, तितकेच महाभारताच्या उत्तरार्धातही आहे. कारण कौरव पांडवांच्या महायुध्दाचे मूळच - एक महत्वाचे कारण -द्रौपदी आहे. द्रौपदीचे आयुष्य म्हणजे एक सूडाचा प्रवास आहे. असे काही समीक्षकांना वाटते. त्यांच्या मते महाभारतात अनेक व्यक्तीचित्रे असली तरी कृष्ण आणि द्रौपदी ही व्यक्तिचित्रे विशेष महत्त्वाची आहेत. आणि त्या दोघांच्या व्यक्तिरेखा एकमेकात संलग्न झालेल्या आहेत.

महाभारतात अनेक स्त्रियांच्या व्यक्तिरेखा आहेत. परंतु त्या सर्व व्यक्तिरेखात अगदी गांधारी, कुंतीपेक्षाही पारगांवकरांना द्रौपदीची व्यक्तिरेखा बहु-आयामी, व्यामिश्र व गुंतागुंतीची वाटते. अशा या गूढ व्यक्तिरेखेच्या जीवनाचे रहस्य उलगडण्याच्या दृष्टीने या कादंबरीची रचना झालेली आहे.

कथानक : वि. शं. पारगांवकरांना कादंबरी निर्मितीचे हे उद्दिष्ट लक्षात घेऊनच या कादंबरीची रचना करावी लागली आहे. त्यांच्या दृष्टीने सांगण्यासारखी एक जमेची बाजू म्हणून महाभारतासारख्या अतिप्रचंड ग्रंथातील व द्रौपदीसारख्या अनेक पैलू असलेल्या मध्यवर्ती नायिकेच्या जीवनाचा विस्तीर्ण पट निवडूनही ही कादंबरी आटोपशीरच झाली आहे, असे म्हणता येईल. कारण द्रौपदी ही व्यक्तिरेखा महत्त्वाची असली तरी तिचे व्यक्तिचित्रण करताना तिच्या जीवनाशी संबंधीत अशा इतर अनेक व्यक्तिरेखांचा उल्लेख येणे हे अपरिहार्य आहे. व तसा उल्लेख पारगांवकरांना करावा लागला आहे.

द्रौपदी ही राजाद्रुपदाची कन्या, श्रीकृष्णाची बहीण (सखी) आणि पांडवांची सम्राज्ञी आहे. तिच्या जन्माची कथा एका चमत्काराशी निगडीत आहे. तो म्हणजे तिचा जन्म मानवी योनीतून झालेला नाही. म्हणजेच ती द्रुपदाची कन्या असली तरी खऱ्या अर्थाने तिला आई लाभली नाही. याचा अर्थ जन्मापासून ती स्वयंसिध्द, म्हणजेच स्वतंत्र आहे. परंतु चार भिंतीत जन्म झाला नसूनही तिला जगाच्या बंधनामुळे जीवनात गुंतून पडावे लागले आहे. एका ऐवजी पाच पती स्वीकारावे लागले आहेत. जन्माप्रमाणे तिचा मृत्यूही अलौकिकच आहे. महानिर्वाणाला पाच पांडवासह निघाले असताना तिचा मृत्यू झाला आहे. तिला सदेह स्वर्गात जाता आले नाही. म्हणजे एका दृष्टीने तिचा शेवटही अपूर्णच राहिला आहे.

ही कादंबरी व्यक्तिचित्रणात्मक असल्यामुळे यातील कथानकाची निर्मिती व्यक्तिरेखांच्या आधारेच कादंबरीकाराला करावी लागली आहे. व यासाठी द्रौपदीच्या विवाहपूर्वकालापासून ते तिच्या जीवनाच्या शेवटपर्यंतच्या जीवनकथेची त्यांनी निवड केली आहे. कोणत्याही कथानकाला प्रारंभ, मध्य व शेवट अशा तीन

अवस्थेतून जावे लागते. या प्रमाणे पांडवांची व द्रौपदीची स्वयंवर प्रसंगी पडलेली गाठ या प्रसंगापासून कथानकाची खरी सुरुवात होते. परंतु ही सुरुवात म्हणजे प्रत्यक्ष स्वयंवराचा प्रसंग निर्माण करण्यापूर्वी जवळ जवळ ५० पृष्ठांची पार्श्वभूमी लेखकाला निर्माण करावी लागली आहे. यामध्ये शकुनी व दुर्योधनाचे पांडवांना वारणावताला पाठविण्याचे कारस्थान, पुत्र मोहामुळे धृतराष्ट्राने त्यामध्ये सामील होणे. आपण निष्पक्षपाती आहोत असे दाखविण्यासाठी गांधारीची संमती घेणे, भीष्म व विदुर यांच्या विरोधाला न जुमानता पांडवांना वारणावताला पाठविणे, लाक्षागृहात त्यांना जाळून ठार मारण्याचा कौरवांनी रचलेला कट विदुराने चतुराईने अयशस्वी करणे, त्यातून सुखरुप सुटका झाल्यावर पांडवांना नेमके द्रुपदाच्या नगराशी यावे लागणे यात ५० पृष्ठे खर्च होतात. त्याशिवाय पृष्ठ ९४ पासुन पृष्ठ १०० पर्यंत द्रौपदीच्या आत्मचिंतनाच्या रुपाने पुन्हा पूर्वीच्या कथेचे पुनर्कथन केले आहे. या ५० पृष्ठांचे लेखन करण्यात पुढे घडणाऱ्या घटनाचे बीज कादंबरीकाराने रोवले आहे. असे म्हणता येईल. शकुनी व दुर्योधन यांना पांडवांचे बरे बघवत नाही. कसेही करुन पांडवांचा नाश हे त्यांचे उद्दिष्ट आहे. यामध्ये धृतराष्ट्रही प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सामील आहे. परंतु पांडवांना नष्ट करण्याचा त्यांचा बेत नुसता उधळला गेलेला नाही तर द्रौपदी सारख्या रत्नाची प्राप्ती पांडवांना झाली आहे. द्रौपदी स्वयंवरापासून कथानकातील दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होते. द्रौपदीला जिंकण्यासाठी अर्जुनाने मत्स्यभेद केला. परंतु त्यावेळी पात्रता असूनही कर्णाला ती संधी मिळाली

नाही. ' द्रौपदी स्वयंवर ' या एकाच घटनेतून पुढील अनेक घटनांची बीजे रोवली गेली. पांडवांच्या जीवन वैभवाचा आलेखही विस्तारला गेला व त्यामुळे ते काट्यासारखे कौरवांच्या डोळ्यांत सलू लागले.

आजपर्यंत पांडव विशेषतः भीम - अर्जुनाचा पराक्रम हाच कौरवांच्या रागाचा विषय होता. परंतु पांडवांना झालेली द्रौपदीची प्राप्ती हा आणखी एक महत्त्वाचा विषय त्यांना मिळाला. कारण द्रौपदीच्या पांडवांशी झालेल्या विवाहाने पांडवांची राजकीय ताकदही वाढली. या प्रसंगाने जसा दुर्योधन दुखावला गेला, व या दोन्ही घटनांची जबरदस्त किंमत पुढे पांडवांना द्यावी लागली.

इथून पुढील कथा ही द्रौपदीच्या जीवनात घडलेल्या अनेक घटना, प्रसंगाशी जोडली गेली आहे. स्वयंवराचा ' पण' जिंकूनही द्रौपदीच्या वाट्याला मागून आणलेली भिक्षा असे जीवन आले आहे. त्यामुळे केवळ अर्जुनाशी विवाह करण्याचे तिचे स्वप्न अपुरे राहिले आहे. त्यानंतर पाच पांडवांची सम्राज्ञी म्हणून तिला सुखासमाधानाने जगता आलेले नाही.

द्रौपदी स्वयंवरामुळे राजा धृतराष्ट्राला पांडवांशी तडजोड करावी लागली आहे. व मनाविरुध्द राज्याची वाटणी करुन दयावी लागली आहे. ती करतानाही कपटी चाल खेळून खांडववनासारखा निर्जन व वैराण प्रदेश त्यांनी पांडवांच्या स्वाधीन केला आहे. परंतु स्वतःचा पराक्रम व कृष्णाचे सत्कार्य या दोन गोष्टींमुळे पांडव पुन्हा एकदा कौरवांवर मात करतात. त्यात राजसूय यज्ञ व मयसभेची निर्मिती या प्रमुख घटना पांडवांच्या वैभवात भर टाकतात. या दोन्ही घटनांमुळे द्रौपदीला आपण खऱ्या अर्थाने सम्राज्ञी झालो आहोत असे वाटू लागणे हे स्वाभाविक आहे. परंतु यामुळेच दुर्योधनाचा वैराग्नी भडकून धृतराष्ट्राच्या दुबळेपणामुळे पुढील द्यूताचा प्रसंग घडून आला आहे.

इथून पुढे कथानक वेगाने आकार घेऊ लागते. 'द्रौपदीवस्त्रहरण' हा कादंबरीतील मुख्य संघर्ष बिंदू आहे.त्यामुळेच पुढील अनेक घटना घडून येतात. वास्तविक युधिष्ठिराने कैफाच्या भरात स्वतःला पणाला लावले व तो हरला इथपर्यंतचा भाग स्वाभाविक आहे. पण तो हरल्यावर त्याला द्रौपदीला पणाला लावण्याचा हक्क उरतो काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. द्रौपदीने विचारलेल्या या प्रश्नाचे उत्तर कोणालाही देता आलेले नाही.

वास्तविक द्रौपदी वस्त्रहरण हाच येथून पुढे घडलेल्या घटनांचा मुख्य बिंदू असूनही कादंबरीकाराने द्रौपदी वस्त्रहरण हा प्रसंग गाळला आहे. त्यादृष्टीने

कादंबरीतील पृष्ट १२४ पासून पृष्ट १२९ पर्यंत कादंबरीकाराने केलेले वर्णन महत्त्वपूर्ण आहे. कदाचित द्रौपदीवस्त्रहरण ही भाकड कथा किंवा दंतकथा वाटून कादंबरीकाराने ती टाळली असावी. परंतु कृष्णाने द्रौपदीचे लज्जा रक्षण केले हा महाभारतातील अतिशय महत्त्वाचा प्रसंग पारगांवकरांनी का टाळावा याचे नेमके उत्तर सापडत नाही. पुढे पृष्ट १४१ वर झालेल्या श्रीकृष्ण भेटीतून त्याचा थोडासा उलगडा करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. या घटना घडत असताना कृष्ण हा पांडवांपासून लांब असल्यामुळे त्याला त्या कळू शकल्या नाहीत. तसेच द्यूताचा प्रसंग तो टाळू शकला नाही, असे स्पष्टीकरण दिले जाते. परंतु ते फारसे पटण्यासारखे नाही. यामुळे एवढ्या महत्त्वाच्या घटनेबाबत पारगांवकर उदासिन का राहिले याचे निश्चित स्पष्टीकरण कळू शकत नाही.

कथानकाच्या या मध्यानंतर अनेक महत्त्वाच्या घटना घडत राहतात. त्यात वनवास व अज्ञातवासात भोगावे लागणारे प्रसंग हे महत्त्वाचे आहेत. या सर्व प्रसंगात जटासुराने नकुल, सहदेव आणि युधिष्ठिरासह द्रौपदीचे केलेले हरण व त्या संकटातून भीमाने केलेली त्यांची सुटका, धृतराष्ट्राचा जावई जयद्रथ याने तिची केलेली विटंबना, विराटाचा सेनापती कीचक याने द्रौपदीला दिलेला त्रास या घटना महत्त्वाच्या आहेत. या सगळ्या प्रसंगाने द्रौपदी ही अतिशय अस्वस्थ झालेली आहे. तिच्या या अस्वस्थतेचे पारगांवकरांनी ठिकठिकाणी वर्णन केलेले दिसते. आपले एवढे पाच पती असूनही आपण निराधारच आहोत या जाणीवेने ती अतिशय हळवी

झालेली आहे. आपल्या जीवनाचा अर्थ शोधण्याचा ती अनेक अंगाने प्रयत्न करते. परंतु ती नामोहरम होत नाही. प्रतिकूल अवस्थेतूनही वाट काढण्याचा ती प्रयत्न करते. अशावेळी तिला श्रीकृष्णाची आठवण होते. त्या वेळी श्रीकृष्णाचा आधार तिला मिळतो. द्रौपदीच्या जीवनामध्ये एखादया दीपस्तंभासारखा श्रीकृष्ण आहे. - या सूत्रावरच ही कादंबरी लिहिली गेली आहे.

वनवासातील व अज्ञातवासातील अनेक संकटांना तोंड देऊन पांडव अधिकच बलिष्ठ होत जातात. सत्ता नसूनही त्यांना एक महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. विजनवासात त्यांना अनेक राजकीय मित्र भेटतात. या सगळ्यामुळे कौरवांनी पांडवांशी तडजोड करावी हा विचार निर्माण होतो. परंतु द्रौपदीला तडजोड नको असते. तिच्या जीवनात ज्या अनेक घटना घडतात त्यावर तिचे नियंत्रण नसते त्यामुळे " हे सर्व दुःख, हा सर्व अपमान द्रौपदीच्या मनात इंगळ्याप्रमाणे डसत होता. तिला स्वास्थ्य नव्हते. तिचा कोणावरही विश्वास राहिलेला नव्हता. तिला भविष्यकाळाविषयी शाश्वती वाटत नव्हती, वर्तमानकाळाचे दुःख तिला सोसवत नव्हते, आणि भूतकाळाकडे पाहून मन तृप्त होत नव्हते ", [२] या शब्दांत कादंबरीकारांने तिची मनोव्यथा व्यक्त केली आहे. कौरव - पांडवात समेट घडवून आणण्यासाठी

श्रीकृष्ण शिष्टाईस जाण्यासाठी निघतो. त्यावेळी धर्मराजाने घेतलेली भूमिका तिला आवडत नाही. त्यावेळची तिची प्रतिक्रिया अतिशय स्वाभिमानाची व एखाद्या तेजस्वीनीची आहे. द्रौपदी ही युधिष्ठिराप्रमाणे तत्वज्ञानी नव्हती. ती एक व्यवहारी स्त्री होती. तिला धर्मशास्त्र माहित होते. पण त्याचा अतिरेक मान्य नव्हता. युधिष्ठिराप्रमाणेच भीमही युध्द टाळतो. तो म्हणतो, " कृष्णा, युध्द टाळण्याचा तू जरुर प्रयत्न कर. युध्दाने आजवर कोणाचेच भले झालेले नाही. सामोपचाराने ज्या गोष्टी साध्य होतील त्या होतील. या पेक्षा आपल्याला अधिक काही नको आहे. "[२]
हे भीमाचे शब्द ऐकून तिला काही समजेनासे होते. क्षणभर तिच्या डोळ्यांपुढे अंधारी येते. भीमानेही युध्द टाळण्याचे सांगावे याचे तिला आश्चर्य वाटते. त्यामुळे द्रौपदी ही श्रीकृष्णाला " तू युधिष्ठिराचे बोलणे ऐकू नकोस. तसेच तू भीमाच्या बोलण्याकडेही लक्ष देऊ नकोस. उद्या अर्जुन, नकुल, आणि सहदेव हे देखील असेच बोलावयास लागतील त्यात त्यांचा काही दोष नाही, त्यांचा नेता युधिष्ठिर आहे. आणि युधिष्ठिराच्या मनाचा थांग कोणालाही लागलेला नाही. तो कोणत्यावेळेस काय बोलेल, कोणाला केव्हा आणि कशी दया दाखवील, कोणाला कोणत्या ठिकाणी आणि कोणत्या परिस्थितीत क्षमा करील हे काहीच सांगता यावयाचे नाही. तर सध्याच्या परिस्थितीत पांडवांचे सारसर्वस्व तूच आहेस किंवा तूच पांडवांचे दारिद्रयही आहेस. या क्षणी तू जे ठरविशील तेच होणार आहे. आज सर्वांचे भविष्य तुझ्या हातात आहे. त्याप्रमाणे माझे भविष्यातील जीवन देखील तुझ्या हातात आहे. तेव्हा तू सर्व

गोष्टींचा योग्य विचार कर आणि योग्य निर्णय घे. "[३] अशी विनंती करते. यावेळी श्रीकृष्णाने द्रौपदीला दिलेले उत्तर अतिशय महत्वाचे असून त्यातून श्रीकृष्णाने द्रौपदीचे दुःख ओळखले होते हे स्पष्ट होते. तो म्हणतो "कृष्णे, तूच एकटी या ठिकाणी निर्भय, स्वाभिमानी आणि खरी क्षत्रियवृत्तीची आहेस, तुझ्याकडे पाहून मला शिष्टाईसाठी जाण्याचा उत्साह वाटतो. तुझे दुःख मी जाणतो. तसेच पांडवांचे शौर्यदेखील जाणतो. युधिष्ठिराची धर्मभावना आणि त्याचे क्षत्रियतेज यामध्ये नेहमीच लढत असते. तरी शेवटी तो एक खरा क्षत्रियच आहे. राज्य करणे, लोकहित साधणे आणि राज्यासाठी युध्द करणे या गोष्टी क्षत्रियाला चुकलेल्या नाहीत. या सर्व गोष्टींची जाणीव जशी माझ्या मनात आहे तसेच धर्मअधर्माविषयीचे विचारदेखील माझ्या मनात आहेत. या प्रसंगी मी तुला एवढेच सांगतो की सर्व गोष्टी तुझ्या मनासारख्या होतील. "[४]

श्रीकृष्णाचे बोलणे ऐकून द्रौपदी प्रसन्न होते. पुढे कौरवाकडे श्रीकृष्ण शिष्टाई करतो. त्याला दुर्योधन " मला हतवीर्य समजू नकोस. पाच गावेच काय पण सुईच्या अग्राखाली मावेल एवढी जमीन देखील मी पांडवांस देणार नाही. मग याचा परिणाम काय जो व्हावयाचा असेल तो होईल ."[५] असे उद्दाम उत्तर देतो. तरीही युध्द टाळण्याचा एक अखेरचा प्रयत्न म्हणून श्रीकृष्ण " मूर्खा, तू हे काय करीत आहेस याची मला संपूर्ण कल्पना आहे. तू एखाद्या निर्जीव दोरीने हत्तीला बांधू पाहातो आहेस. तू एकदा बाहेर डोकावून बघ. माझे सैन्य केवळ तुझ्याच सैन्याचा

फइशा पाहण्यास सज्ज नाही तर सर्व कौरवांना या क्षणी नष्ट करण्यास हे सज्ज आहे. तरी उद्याचे मरण आजला ओढवून घेऊ नकोस" [६] असे बजावून सांगतो. पुढे तो कर्णाला " तू कुंतीपुत्र आहेस. कुंतीचा जेष्ठ पुत्र , पांडवांचा थोरला भाऊ तू खरे तर पांडवांच्या पक्षात असावयास हवा आहेस. परंतु तुझे जन्म रहस्य माहित नसल्यामुळे तू अजाणतेपणी चुकीच्या पक्षात जाऊन मिळालेला आहेस. तू मृगजळात फसलेला आहेस. तुला जे पाणी वाटते ते पाणी नसून ती एक जीवघेणी हूल आहे. तरी तुला माझे सांगणे एवढेच की तू अजून तरी सावध हो आणि योग्य पक्षात जाऊन सामील हो. तूला तू पांडवात थोरला असल्यामुळे राज्यपद मिळेल. एवढेच नव्हे तर द्रौपदी देखील तुला मिळेल ." [७] श्रीकृष्णाच्या बोलण्याने कर्णाचे सारे जीवन हादरून जाते. तरीही कर्णाला मागे जाता येत नाही व पुढेही जाता येत नाही. तो म्हणतो, " मी जरी पांडवांच्या विरुध्द आणि कौरवांच्या बाजूने युध्दात उभा राहिलो तरी मी अर्जुन सोडून इतर पांडवांशी युध्द करणार नाही. या युध्दात अर्जुन तरी मरेल किंवा मी तरी ," [८] असे वचन तो देतो. हाही मार्ग संपल्याने युध्द अटळ ठरते. द्रौपदी युधिष्ठिराला युध्द करण्याची शेवटची विनंती करते. पृष्ठ १७३, १७४ वरील युधिष्ठिर द्रौपदीचे संवाद या दृष्टीने महत्वाचे आहेत. यानंतर द्रौपदी कृष्णाशी चर्चा करते. व शेवटी युध्द सुरू होते.

ज्या द्रौपदीवरुन महायुध्द झाले त्या महायुध्दाचे प्रत्यक्ष वर्णन पारगांवकरांनी फारशा तपशीलाने केलेले नाही. इथून पुढे कथानक झपाट्याने उताराला लागते.

कर्णवधानंतर दुर्योधनाच्या आव्हानातील हवाच निघून जाते. तरीही दुर्योधन संपूर्ण ताकदीने भीमाशी युध्द करतो. गदायुध्दाचे नियम मोडून कृष्णाच्या सुचनेवरून उजव्या मांडीवर केलेल्या गदेच्या प्रहारामुळे दुर्योधनाची मांडी मोडते. तरीही अश्वत्थामाकडून द्रौपदीच्या पाच मुलांना मारुन दुर्योधन शेवटचा सूड उगवतो. अशारीतीने जिंकूनही द्रौपदीच्या पदरात काहीही पडत नाही. युध्दात तिचे पाच पती यशस्वी झाले तरी तिचे पाच पुत्र मरण पावतात. तिच्या वंशाचा अंकुर उरत नाही. अशा रीतीने ती एकटीच राहते. अशा परिस्थितीतही कृष्ण तिची समजूत घालतो. " विजय आपलाच झालेला आहे. प्रत्येक विजयाच्या यशात माणसांना काही न काहीतरी दान हे करावेच लागते. हे युध्द तुझ्यामुळेच आम्हांला करावे लागले. त्यामुळे युध्दात जे मिळाले आहे , त्याचा विचार करुन जे गमावले आहे ते विसरुन जा "[९] अशा प्रकारे श्रीकृष्णाने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला तरीही ती अस्वस्थच राहिली . युध्दानंतर घडलेल्या घटना कादंबरीकाराने अवघ्या एका प्रकरणात गुंडाळलेल्या आहेत. त्यापूर्वी पृष्ठ १९० ते १९५ पर्यंत कुरुक्षेत्रावरील युध्दोत्तर परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या भयाण दृश्यांचा धृतराष्टाने केलेल्या दुःखाचा व गांधारीच्या पुत्रशोकाचा द्रौपदीच्या मनावर झालेल्या परिणामाचे थोडक्यात वर्णन कादंबरीकाराने पृष्ठ १९२ वर केले आहे. याचवेळी गांधारी द्रौपदीला " तू फार भोगलेले आहेस. येथून पुढेतरी तुझे कल्याण हो "[१०] असा आशिर्वाद देते. त्यानंतर युधिष्ठिर पुन्हा राज्यावर बसतो. तो अश्वमेध यज्ञ

करतो. तो झाल्यावर धृतराष्ट्र , गांधारी, कुंती आणि विदुर वानप्रस्थाश्रम स्वीकारुन वनात निघून जातात. त्यानंतर द्वारकेस जाण्यापूर्वी कृष्ण द्रौपदीला " जीवन हे अलिप्ततेने जगले व भोगले पाहिजे " [११] असे सांगतो. आपला जवळचा मित्र अर्जुन यालाही चार महत्त्वाच्या गोष्टी सांगतो. पृष्ठ २०० वर कृष्णाची अखेर दाखविली आहे. एका पारध्याचा बाण लागण्याचे निमित्त घेउन कृष्ण हे जग सोडतो. त्यानंतर पृष्ठ २०४ वर धृतराष्ट्र, गांधारी व कुंती या तिघांचे महानिर्वाण दाखविले आहे. शेवटच्या प्रकरणात पांडवही महानिर्वाणाला निघतात. ते हिमालयाचा प्रवास करतात व तो प्रवास चालू असतानाच द्रौपदीला भोवळ येउन ती जमिनीवर खाली पडते. यानंतर द्रौपदी व भीम यांच्यामध्ये झालेल्या संवादामधून " हे जीवन आहे ते कठोरपणे जगलेच पाहिजे " [१२] असे सांगून आपल्या जीवनाला पूर्णविराम देते. याठिकाणी कादंबरी पूर्ण झालेली आहे. कथानकानंतर आपणांस व्यक्तीचित्रांचा विचार करावा लागेल.

व्यक्तीचित्रण :

द्रौपदी :

' अयोनिजा ' या द्रौपदी या प्रमुख व्यक्तिरेखेवर आधारलेल्या कादंबरीत द्रौपदीचा प्रवेश पृष्ठ ५१ वर आहे. त्याअगोदर महर्षी व्यासमुनींकडून द्रौपदीचे स्वयंवर राजा द्रुपदाने मांडलेले असून द्रौपदी ही अर्जुनासाठी योग्य वधू आहे व ती मिळाल्यानंतर तुमचे दिवस पालटतील, अशी पांडवांना माहिती मिळते.

स्वयंवरासाठी आलेल्या द्रौपदीच्या सौंदर्याचे अलौकिक वर्णन कादंबरीकाराने केले आहे. तिचे वर्णन करण्यापलीकडे तिचे रुप होते. म्हणजेच द्रौपदी ही केवळ अवर्णनीय असल्याचे वाचकांना कळते. द्रौपदीच्या बाह्यरुपाप्रमाणेच ती अतिशय स्वाभिमानी, संयमी व कोणत्याही परिस्थितीला न घाबरणारी असल्याचे वाचकांना जाणवते. स्वयंवरासाठी लावलेला 'पण' जिंकणे अतिशय अवघड असते. परंतु हा 'पण' कर्ण जिंकणार असा अंदाज आल्यावर मी सूतपुत्राला वरणार नाही असे ती निक्षून सांगते.

या एका घटनेचे तिला पुढील आयुष्यात फार मोठे परिणाम भोगावे लागले आहेत व याची तिला जाणीव आहे.

या पुढे तिच्या आयुष्यात अनेक नाट्यपूर्ण घटना घडलेल्या आहेत. प्रत्यक्ष 'पण' अर्जुनाने जिंकला असला तरी त्यासाठी स्वयंवराला आलेल्या अनेक राजांशी त्यांना युध्द करावे लागले आहे. शिवाय ब्राम्हण वेशात हा 'पण' जिंकलेला असल्यामुळे त्यावेळी फार मोठा गोंधळ उडालेला आहे. परंतु या परिस्थितीमुळे द्रौपदी मुळीच विचलीत झालेली नाही. परंतु या पुढच्या घटनेने मात्र पुढील आयुष्यात तिला फार मोठ्या संकटांना तोंड द्यावे लागले आहे. ती घटना म्हणजे तिचा पाच पांडवांशी झालेला विवाह, ज्यामुळे तिच्या जीवनाची दिशाच बदलून गेली आहे. वास्तविक द्रौपदी ही 'यज्ञ' वेदीवर जन्माला आलेली मुलगी, तिला स्वयंवरात अर्जुनाने जिंकले. परंतु कुंतीच्या सांगण्यामुळे तिला पाच पतींना स्वीकारावे

लागले आहे. यामुळे तिच्या आयुष्यात दोन महत्वाच्या समस्या किंवा प्रश्न निर्माण झालेले आहेत. एक म्हणजे कर्ण हा दुर्योधनाचा उजवा हात आहे. त्याला तिने नाकारून एका संकटास निमंत्रणच दिले आहे. शिवाय दुर्योधन त्याचा साथीदार आहे. यामुळे हे दोघे एकत्र येऊन पुढे काय करतील यासंबंधीची काळजी तिच्या मनात आहे. याशिवाय एका स्त्रीस पाच पती असणे आणि एका पतीला पाच स्त्रिया असणे यामध्ये फरक आहे. याशिवाय हे पाचजण म्हणजे सामान्य व्यक्ती नसून पाच पांडव आहेत. पाच पांडवांच्या मध्ये आपणामुळे स्पर्धा, ईर्षा आणि द्वेष निर्माण होईल की काय ? ही तिची दुसरी समस्या आहे.

द्रौपदीची ही समस्या नारदासारख्या महामुनीलाही पटली आहे. कारण ती फार गुणी, बुद्धिमान असली तरीही ती अतिशय सुंदर आहे. ती अतिशय सुंदर आहे यामुळेच पाच पांडवात तिच्यामुळे फूट पडू नये म्हणून आजच्या शब्दात नारदमुनींनी त्यांना एक आचारसंहिताच सांगितली आहे. नारदमुनींच्या सांगण्याप्रमाणे वागत असतानाच एक महत्त्वाची अडचण निर्माण झाली आहे. ती म्हणजे ब्राम्हणांना संकटातून सोडविण्यासाठी अर्जुनाला द्रौपदीच्या महालात जाऊन शस्त्रे आणावी लागत आहेत. आणि त्यातही द्रौपदी एकटी नसून ती युधिष्ठिराबरोबर रत आहे. आपणाकडून झालेल्या चुकीचे प्रायश्चित म्हणून बारा वर्षांचा वनवास अर्जुनाला भोगावा लागतो.

यावेळी द्रौपदी अतिशय दुःखी होते. परंतु तिला समभाववृत्तीने स्वीकारलेला

हा निर्णय मान्य करावा लागतो. त्यावेळी तिच्या मनांत निर्माण झालेल्या भावनांचे पृष्ठ ९१ वर कादंबरीकाराने वर्णन केलेले आहे. अर्जुनाशी लग्न करावयाचे असा तिचा निर्धार पूर्वीपासूनच होता व अर्जुनाशिवाय दुसऱ्या कोणालाही जिंकता येऊ नये इतकी अवघड अट तिनेच आपल्या वडिलांना सुचविली होती. म्हणजे फक्त अर्जुनाशीच विवाह करावयाचा असूनही तिला केवळ कुंतीच्या सांगण्यावरुन पाच जणांशी विवाह करावा लागतो. ही घटना केवळ नाईलाजाने तिला स्वीकारावी लागली होती. आणि त्यातच अर्जुनाला बारा वर्षाच्या वनवासासाठी राजधानी सोडून जावे लागले होते. या काळात उलुपी, चित्रांगदा आणि सुभद्रा अशा तीन स्त्रियांशी त्याची लग्ने झाली. सुभद्रेशी अर्जुनाने केलेला विवाह तिला मुळीच आवडलेला नाही. ती " तुम्ही इकडे कशाला आलात ? सुभद्रेकडे जा. गवताचा भारा कितीही आवळून बांधला तरी त्याला दुसऱ्या दोरीने आवळताना पहिल्या दोरीची पकड सैल होते"१३ या शब्दांत आपला राग व्यक्त करते. पुढे सुभद्रा ही द्रौपदीची मर्जी संपादन करते. द्रौपदीलाही पाच पांडवापासून पाच पुत्र होतात व त्यानंतर मयसभेसारख्या अतिशय वैभवशाली सभागृहाची पांडवांना, पर्यायाने द्रौपदीला प्राप्ती होते.

परंतु द्रौपदीचे आयुष्य म्हणजेच जणू ऊन - सावलीचा खेळच होता असे म्हणावे लागेल. सुखाच्या वर्षावानंतर संकटाच्या काळ्या मेघाला तिला सतत सामोरे जावे लागते. राजसूय यज्ञासारखा प्रचंड यज्ञ झाल्यावर व पांडव वैभवाच्या शिखरावर पोहोचल्यावर दुर्योधनाला प्रचंड संताप यावा ही स्वाभाविकच गोष्ट होती.

पांडवांच्या राज्याची सम्राज्ञी झाल्यावर जगातील अतिशय दुर्मिळ असे राजवैभव तिला मिळाले हा एक सुंदर योगायोग होता. पण या योगायोगाच्या पाठोपाठ तिला दुसऱ्या एका अतिशय लाजिरवाण्या व अपमानास्पद प्रसंगाला सामोरे जावे लागले त्यात तिची चूक नव्हती . तशी चूक असली तरी मयसभेत दुर्योधनाच्या झालेल्या फजितीला द्रौपदी हसल्यामुळे त्याचा सूड घेण्यासाठी शकुनीला हाताशी धरुन दुर्योधनाने द्यूताचे कपट रचावे हे स्वाभाविक होते. त्यातच द्यूतात आपले सर्वस्व गमावल्यावर युधिष्ठिराने तिला पणाला लावले आणि त्यातच तो द्रौपदी हरला. त्यामुळे द्रौपदीला कौरवांची दासी म्हणून ती एकवस्त्रा आणि रजस्वला असताना अत्यंत अपमानास्पद अवस्थेत कौरवांच्या दरबारात यावे लागले. या क्षणापूर्वीच्या महाराणीला एक दासी म्हणून परिस्थितीला सामोरे जावे लागले. तरी त्याही परिस्थितीत तिची विवेक बुध्दी व स्वाभिमान जागृत होता. त्यामुळे तिने " स्वतः दास झालेल्या युधिष्ठिराला, द्रौपदीला दासी बनविण्याचा काय अधिकार आहे ? " असा प्रश्न विचारला. जोपर्यंत या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. तोपर्यंत सभागृहात येण्यास नकार दिला परंतु तिला त्याही परिस्थितीत सभागृहात येणे प्राप्त झाले. हजारो लोकांसमोर दुःशासन व दुर्योधन यांनी तिची विटंबना आरंभली. विदुराने विरोध करुन पाहिला परंतु दुर्योधनाने त्याचे म्हणणे ऐकले नाही. भीष्मासारखे काही पुरुष सभेत उपस्थित असताना देखील काहीही करु शकले नाहीत तरीही द्रौपदीने धीर सोडला नाही. त्याही सभेत तिने स्वतःच्या बचावाचे भाषण केले. शेवटी

गांधारी तिच्या मदतीला आली. आणि त्या संकटातून तिची सुटका झाली.

त्यावेळी तिने केलेले वर्तन एखाद्या महान व्यक्तीस शोभण्यासारखेच आहे. तिने चातुर्याने आपणांबरोबरच पाच पतींनाही दास्यांतून सोडवले. व त्या कठीण परिस्थितीत धृतराष्ट्राचे मन जिंकले. तिच्या या वागणूकीचा गौरव सर्व सभागृहाने केला असा उल्लेख पृष्ट १३१ वर आला आहे. धृतराष्ट्राने द्रौपदीची स्तुती केली, तो म्हणाला, " द्रौपदी, तुझे मन फार मोठे आहे. तू खरोखरच कौरवकुलांची ज्येष्ठ सून म्हणून शोभतेस. तुझ्या नवऱ्यांवर तुझी किती प्रीती आहे हे तुझ्या वर्तणुकीवरून साऱ्या सभागृहाच्या लक्षात आलेले आहे. तू एक अनूकरणीय स्त्री आहेस. मी तुझ्यावर प्रसन्नच आहे. तू आणखी एक वर माझ्याकडून मागून घे. तुम्हा सर्वांना मी मुक्त तर केले आहेच. तुमचे राज्यही तुम्हाला परत दिले आहे. परंतु याशिवाय आणखीही तू काहीतरी माझ्याकडून मागावेस अशी माझी इच्छा आहे. " [२४]

परंतु एवढ्याने ही संकट परंपरा संपली नाही. पांडवांना पुन्हा परत बोलावून द्यूताचा एक डाव खेळण्याचा आग्रह धृतराष्ट्राने युधिष्ठिरास केला. तो डाव हरल्यामुळे पांडवांना बारा वर्षे वनवास आणि तेराव्या वर्षी अज्ञातवास भोगण्याची पाळी आली. यामुळे द्रौपदी ही भयंकर चिडली होती. परंतु ती काहीच करू शकली नाही. या प्रसंगामुळे द्रौपदीचा युधिष्ठिरावरचा विश्वास उडाला. तिचे पाय खचून गेले तरीही ती पांडवांबरोबर संकटांची मालिका सोसतच राहिली.

वनवासात असताना तिच्यावर आणखी दोन संकटे आली. तिच्या अलौकिक सौंदर्यामुळे तिचे जीवन अस्थिर आणि भीतिग्रस्त बनले. धृतराष्ट्राचा जावई जयद्रथ याने तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. तिला पळवून नेले. परंतु पांडवांनी त्यातून तिची सुटका केली. दुसरी घटना म्हणजे अज्ञातवासाच्या अगदी शेवटी विराट नगरीत असताना विराटाचा सेनापती कीचक याच्या दुष्ट व कामी स्वभावामुळे तिच्यावर मोठे संकट ओढवले. त्यावेळी त्याला ठार मारुन भीम तिची त्या संकटातून सुटका करतो. एका सम्राज्ञीला एका सामान्य दासीचे जीवन जगावे लागते. पण एवढ्यानेही ही संकट परंपरा संपत नाही कारण पुन्हा कौरव - पांडवामध्ये समेट न झाल्यामुळे महायुध्द होते. अतिशय दुर्दैवाची गोष्ट म्हणजे पाच पांडवांनी महत्त्वाचे निर्णय घेताना कधीही द्रौपदीला विचारात घेतले नाही. महाभारताचा नायक, कृष्ण मात्र तिच्या पाठीशी सतत उभा राहिला.परंतु राजकारणामुळे अगदी भीम - अर्जुनालाही कधीच तिच्या मनाच्या व्यथा जाणता आल्या नाहीत. प्रत्यक्ष कृष्णाने फक्त द्रौपदीच निर्भय व स्वाभिमानी आहे , खरी क्षत्रिय वृत्तीची आहे, असे शिफारस पत्र तिला दिले आहे.याशिवाय धृतराष्ट्रापासून ते नारदमुनीपर्यंत सर्वांनीच द्रौपदीची अलौकिकता मान्य केली आहे. प्रत्यक्ष जीवनात मात्र द्रौपदीला दुःख आणि संकटांच्या मालिकेलाच तोंड दयावे लागले आहे.

महायुध्दानंतर पांडवांना पुन्हा त्यांचे वैभव मिळले. पण द्रौपदीला मात्र तिचे पुत्र गमवावे लागतात. प्रत्येक पांडवाला द्रौपदी सोडून इतर स्त्रिया पत्नी म्हणून

मिळाल्या आहेत. पण द्रौपदीला मात्र पांडवांच्या भवितव्याशीच स्वतःला बांधून घ्यावे लागले आहे.

तिच्या मनाचे हे असमाधान तिने आपल्या आयुष्याच्या शेवटी भीमाला बोलून दाखविले आहे. पांडव महानिर्वाणाला निघाले असताना सर्वात प्रथम द्रौपदीला मृत्यू स्वीकारावा लागतो. यानंतर अर्जुनावर तिचे इतर पांडवापेक्षा जास्त प्रेम असल्यामुळे तिला सदेह स्वर्ग मिळाला नाही, असे स्पष्टीकरण युधिष्ठिर देतो. द्रौपदीचे पाच पांडवावर सारखेच प्रेम होते काय ? असा प्रश्न भीम सुध्दा तिला विचारतो. त्यामुळे ती अत्यंत दुखावली जाते. पांडवांनी तिच्या एकटीशी लग्न केलेले नाही. तिने मात्र प्रामाणिकपणे पाच पांडवांचा संसार केला. असे असतानाही आपणाला असा प्रश्न विचारला जावा, आपल्या चारित्र्यासंबंधी संशय आपल्या पतीकडून घेतला जावा, हे शल्य मनात ठेवून तिला हे जग सोडावे लागते.

द्रौपदीवर तिच्या जीवनात जे असंख्य आघात झाले त्यात हा सर्वात मोठा आघात आहे. तो तिला सहन होत नाही. अत्यंत निराश अवस्थेत तिला मृत्यूला सामोरे जावे लागते. ही तिच्या जीवनाची एक प्रचंड शोकांतिका आहे.

श्रीकृष्ण :

श्रीकृष्णाचा स्वभाव मनमिळावू व सर्वांना एकोप्याने वागवणारा आहे. त्याच्या एकूण स्वभावामध्ये कौरव व पांडव, कुंती, भीष्म, विदुर, धृतराष्ट्र, दुर्योधन, कर्ण या सर्वांबद्दल प्रेम आहे. तो सत्याचा वाली आहे. अन्यायाविरुध्द लढणे हे तो

आपले कर्तव्य समजतो. एक दिवस दुर्योधनाला युध्द टाळण्याचे सांगतो व पांडवास योग्य ती वाटणी द्यावी असे म्हणतो. पण दुर्योधनाच्या उर्मट बोलण्यामुळे श्रीकृष्ण त्याला युध्दास तयार होण्यास सांगतो.

त्याच प्रमाणे कृष्ण कर्णालाही त्याच्या जन्माची हकीगत सांगतो. त्याला पांडवाच्या बाजूस येण्यास सांगतो. युध्द करू नकोस असे ही बजावतो. पण त्याच्याही कडवट बोलण्यामुळे शेवटी युध्द सुरू होते.

श्रीकृष्ण न्यायप्रिय आहे. तो द्रौपदीचा सखा आहे. धृतराष्ट्र, कर्ण, दुर्योधन, द्रौपदी, अर्जुन, भीम, यांना योग्य ते सल्ले तो देत राहतो. आपले कुंतीबाबत असणारे मत स्पष्ट करतो. अतिशय प्रामाणिकपणे तिच्याशी हितगूज करतो. कारण लहानपणापासून कुंतीला तो. ओळखतो. ज्यावेळी बऱ्याच वर्षांनी त्याची भेट होते त्यावेळी दोघांनाही खूप आनंद होतो. दोघांमध्ये सुख - दुःखाच्या गोष्टी चालतात. तो कुंतीचा प्रत्येक शब्द ऐकतो. तो म्हणतो की फक्त तुझ्यामुळेच कृष्णेला शोभा आली आहे. मी तुझ्या पांडवामुळेच घरी आलो आहे. तो. कुंतीला आत्या म्हणतो. कुंतीबद्दल असणारे प्रेम , तिचा आदर , तिचे दुःख , तिची एकनिष्ठता , सर्वांबद्दल तिला असणारे प्रेम या सर्वांची जाणीव कृष्णाला आहे.

धृतराष्ट्र व दुर्योधन हे कसे आहेत, त्यांची वृत्ती कशी आहे, हे स्पष्टपणे तो कुंतीला सांगतो - " आत्या ,तुमच्यावर आलेली संकटे ती तुम्हीच सहन करू शकलात. तुमच्यावर जी परिस्थिती धृतराष्ट्राने आणि दुर्योधनाने आणली. ती केवळ

त्यांचे नीच कर्मच होय. परंतु दैवाने त्या सर्व संकटातून तुम्ही एखाद्या शंभर नंबरी सोन्याप्रमाणे तावून सुलाखून बाहेर पडलात यातच काय ते आले. शौर्य आणि धर्म हा तर तुझ्या मुलात आहेच, परंतु या शौर्य आणि धर्मास देखील परमेश्वरी पाठिंबा आहे, ही केवढी भाग्याची गोष्ट. तरी आता तू मनात काहीही चिंता करू नकोस तुझी मुले महापराक्रमी आहेत. यातच काय ते समज." [१५]

अशारीतीने कुंती व तिच्या पांडवाबद्दल असणारा आपला दृष्टिकोन स्पष्ट करतो. त्याचे सारे व्यक्तिमत्वच प्रकाशमान होते आणि त्याचे अस्तित्व हा देखील एक अलौकिक प्रकाशच होता.

त्याचप्रमाणे धृतराष्ट्रास पांडवाबद्दल योग्य सल्ला देतो व पितामह भीष्म आणि विदुर यांच्या विचारांशी एकनिष्ठ राहण्यास सांगतो. तो म्हणतो, " धृतराष्ट्रा, मला सर्व गोष्टींची कल्पना आहे. या सभेत वृध्दावस्था आहे. तसेच तारुण्यही आहे. शांतता आहे,तसाच उच्छृंखलपणाही आहे, अनुभवाचे बोल आहेत. या सभेत घडलेल्या घटनांचा इतिहास आहे. तसेच पुढे घडलेल्या घडणाऱ्या घटनांचीही इतिहास नोंद करणार आहे. तेव्हा तू अत्यंत शांतपणे तुला जे सांगावयाचे असेल ते सांगण्यास सुरुवात कर. तुझे सर्व बोलणे ही सभा अत्यंत शांतपणे ऐकून घेईल आणि तुझ्या बोलण्यावर जो काही योग्य निर्णय सभेला द्यावासा वाटेल तो ती देईल " [१६] असे तो धृतराष्ट्रास सांगतो. या सांगण्यामध्ये त्याचा प्रामाणिकपणा दिसून येतो. श्रीकृष्ण द्रष्टा व धोरणी असल्यामुळे त्याला सर्व गोष्टींची जाणीव

आहे. प्रत्येकाला तो योग्य सल्ले देतो. दुर्योधनाला युध्द टाळण्यास व पांडवांशी एकरुपतेने वागण्यास सांगतो. तर कर्णास त्याची जाणीव करून देतो. तो एक उत्तम मार्गदर्शक आहे, राजकारणीही आहे, द्रौपदीचा सखा व पाठीराखा आहे. तिच्या कोणत्याही अडचणीला तो धावून जातो. तो म्हणतो, " आता मी आलो आहे. तुझ्याजवळ उभा आहे. मी तुझा सखा कृष्ण भावापेक्षाही अधिक जवळच्या नात्याचा. आता तुझे मन उमलेल. तू सर्व काही मला सांगशील. तुझ्या मनःस्थितीची मला कल्पना आहे. " [२७] अशा रीतीने द्रौपदीला तो आधार देतो. तिने एकटेपणाचे दुःख मुळीच करू नये असाही धीर देतो. द्रौपदीबद्दल त्याच्या मनात आस्था, प्रेम आहे. पाचही पांडवांबरोबर एकनिष्ठ राहण्यास तिला सांगतो. तो म्हणतो, " द्रौपदी, तू एकटी नाहीस. एकटेपणाचे दुःख तुला मुळीच होता उपयोगी नाही. तू द्रुपदाची कन्या, पाच पांडवांची भार्या, कुरुराज्याची महाराणी, कुंतीची लाडकी सून आणि माझी सखी आहेस. यापेक्षा आणखी तुला जास्त काय हवे आहे? आणि यापेक्षाही जास्त काही हवे असल्यास ते निःसंकोच मनाने सांग. मी ते पूर्ण करीन. पांडवांची सम्राज्ञी दुर्मुखलेली असता कामा नये " [२८], अशी जाणीव तिला करून देतो.

अर्जुन, भीम, नकुल, सहदेव यांच्याबद्दल त्याच्या अंतःकरणात प्रेम आहे. अर्जुनाला प्रत्येक ठिकाणी योग्य सल्ला तो देतो. कृष्ण पांडवांचा पाठीराखा आहे.

श्रीकृष्ण हा पूर्णपुरुष आहे. प्रत्येक जीव जन्माला येतो. त्याचे कर्तव्य, कर्म तो करतो, आणि शेवटी मरतो. याची जाणीव कृष्णाला आहे. तो जगाचा निरोप

घेताना हसतमुखाने निरोप घेतो. एका पारध्याचा अंगठ्यास बाण लागून त्यातच त्याचा मृत्यू होतो.

अशी अलौकिक व्यक्तिमत्त्व लाभलेली श्रीकृष्ण ही व्यक्तिरेखा अनेक वाचकांच्या लक्षात राहते. एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व रेखाटण्यामध्ये वि. शं. पारगांवकर यशस्वी झाले आहेत.

<u>युधिष्ठिर</u> :

पांडव कथेमध्ये भीम - अर्जुनापेक्षाही युधिष्ठिराची व्यक्तिरेखा हीच मुख्य व्यक्तिरेखा आहे. सर्व पांडवामध्ये युधिष्ठिर हा थोरला आहे. त्याच्या विचारानेच सर्व भाऊ वागतात. अतिशय संयमी, विचारशील, स्वाभिमानी अशी व्यक्तिरेखा पारगांवकरांनी रेखाटलेली आहे. सर्व पांडवांमध्ये ही मुख्य व्यक्तिरेखा आहे. याचे कारण एका बाजूने जसा दुर्योधन, शकुनीच्या डावपेचामुळे पांडवांना वनवास सहन करावा लागला आहे, किंवा अनेक संकटांना सामोरे जावे लागले आहे. तसेच युधिष्ठिराच्या अतिरेकी सहनशील स्वभावामुळे व आदर्शवादी भूमिकेमुळेच पांडवांना वेळोवेळी संकटास सामोरे जावे लागले आहे. शत्रूचे डावपेच ओळखूनही केवळ स्वतःच्या स्वभावामुळेच तो असे वागतो. तो भीमाप्रमाणे भोळा नाही, किंवा निर्णय घेण्याचे सामर्थ्यही त्याच्या ठिकाणी नाही. परंतु स्वतःला राजकारणी म्हणवून घेण्यापेक्षा धर्मात्मा म्हणवून घेण्यात त्याला अधिक रस आहे व म्हणूनच त्याचे मूळ नाव 'युधिष्ठिर' म्हणजेच 'स्थिर बुध्दीचा' असे असले तरी संपूर्ण महाभारतात

तो धर्मराज म्हणून वावरला आहे. या कादंबरीतही पारगावकरांनी त्याची व्यक्तिरेखा रंगवताना कुठेही ' धर्मराज ' हा शब्द वापरला नसला तरीही ' धर्मराज ' म्हणूनच त्याचे वर्णन केले आहे. या कादंबरीतील जवळ-जवळ सर्व प्रकरणात युधिष्ठिर व भीम यांचे उल्लेख आले आहेत.

अर्जुन :

वास्तविक महाभारतात नायक कृष्ण असला तरी पांडव परिवाराचा नायक अर्जुनच आहे. युधिष्ठिर हा ज्येष्ठ पांडव असला व त्यामुळे राजपद त्याच्याकडे चालून आले असले तरी भीम - अर्जुनाच्या आधारावरच त्याचे भौतिक अस्तित्व अवलंबून आहे. कौरवांना सुध्दा भीम कितीही महापराक्रमी असला तरी खरी भीती अर्जुनाचीच आहे. अर्जुन हाच खऱ्या अर्थाने पांडवांचा नेता असून कृष्णाचा खरा मित्र आहे. याज्ञसेनीच्या नावाने निर्माण झालेल्या या कादंबरीत अर्जुनाच्या व्यक्तिरेखेला खूप महत्व हवे. कादंबरीकाराने द्रौपदी स्वयंवरापासून अर्जुनाच्या आयुष्यातील सर्व प्रमुख घटनांचे उल्लेख किंवा वर्णन केले असले तरही मूळ महाभारतातील त्याच्या महापराक्रमी तेजस्वी स्वभावाचे प्रभावी वर्णन येथे जाणवत नाही.

द्रौपदी स्वयंवरापासून किंवा त्या अगोदरच भीम - अर्जुनाच्या व्यक्तिरेखांचा प्रवेश कादंबरीत झाला आहे. पाच पांडवांचे पहिले दर्शन वाचकांना इथे घडते. तेव्हाच त्या पाचांच्या स्वभावाचे प्रमुख विशेष कादंबरीकाराने याज्ञसेनीत सांगितलेले आहेत.

उदा. धर्मराजाचा स्थिर व सहिष्णु स्वभाव, भीमाचा रागीट स्वभाव, नकुल

आणि सहदेव यांचे अस्थिर स्वभाव, युधिष्ठिराचा कल पाहून वागण्याचा अर्जुनाचा स्वभाव इत्यादी उल्लेख पृष्ठ २७ वर आलेले आहेत.

तसे पाहिले तर पाच पांडवात ज्येष्ठतेनुसार अर्जुनाचा क्रमांक तिसरा आहे. महाभारतात तो तिसरा पांडव किंवा मध्यम पांडव म्हणून ओळखला गेला आहे. परंतु स्वभावानेही तो मध्यमच राहिला आहे. संपूर्ण पृथ्वी जिंकण्याइतका पराक्रमी असूनही त्याला युधिष्ठिर किंवा भीमासारखी टोकाची भूमिका कधीही घेता येत नाही. एका बाजूने तो युधिष्ठिराच्या अतिरेकी सहिष्णुतेला आवर घालण्याचा प्रयत्न करतो. तर दुसऱ्या बाजूला तो भीमाच्या संतापाला आवरतो. द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी भीम जेव्हा, ज्या हाताने युधिष्ठिर द्यूत खेळतो त्याचे हात जाळण्यासाठी " सहदेवा थोडा अग्नी आण " असे सहदेवाला सांगतो. तेव्हा अर्जुनानेच त्याला सावरले आहे, व त्याचा राग शांत केला आहे. कारण युधिष्ठिर हा नुसता राजा नसून तो पांडवांचा नेता आहे. थोरला भाऊ आहे, शिवाय धर्मज्ञ आहे. त्यामुळे त्याचा मानभंग न करताच कोणत्याही परिस्थितीतून मार्ग काढण्याचे हे धोरण अर्जुनाने आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत सांभाळले आहे.

तसेच विवाह करुन द्रौपदी हीच त्याची खरी लाडकी पत्नी आहे. भीमाप्रमाणेच द्रौपदीच्या मानी, मनस्वी स्वभावास अर्जुनानेच सतत थोडेफार नियंत्रण घालण्याचा प्रयत्न केला आहे. अर्जुनाचा मित्रपरिवार व त्याच्या पराक्रमाची प्रसिध्दी तत्कालीन राजकारणी लोकांना होती. स्वतःला महापराक्रमी समजणारा महारथी कर्णही

फक्त अर्जुनालाच आपल्या बरोबरीचा मानीत होता. अर्जुनाने आपल्या पराक्रमाने देवांचा राजा इंद्र व साक्षात शंकराशीसुध्दा प्रसंगी दोन हात केले आहेत.

भीम :

पहिल्या प्रकरणात वारणावत प्रकरणाच्या निमित्ताने जी पांडवांची चर्चा होते. त्यामध्ये युधिष्ठिर हा आदर्शाचा अतिरेक वाटतो. तर भीम हा व्यवहाराचा अतिरेक वाटतो.

या कादंबरीत भीम हा पराक्रमी मल्ल योध्दा म्हणजे डोक्याचा वापर फारसा न करणारा माणूस असेच त्याचे वर्णन अनेक ठिकाणी आले आहे. या कादंबरीतही कादंबरीकाराने अर्जुन व युधिष्ठिरापेक्षाही भीमाचे व्यक्तिचित्रण विस्ताराने केले असले तरी तो फारसा विचार न करणारा, खोलात न शिरणारा, 'कृतीवीर' माणूस असेच त्याचे वर्णन केले आहे. तो अतिशय निर्भय आहे. स्वतःच्या शौर्याचा त्याला एक प्रकारचा गर्व आहे, असे म्हटले तरी चालेल. एका ठिकाणी द्रौपदीशी बोलताना माझे शौर्य हे त्रिकालाबाधित आहे. असे तो म्हणतो. त्याचे साधे - साधे हास्य सुध्दा इतके गडगडाटी असते की, निर्भय व धीट अशा द्रौपदीच्या सर्वांगावर सुध्दा रोमांच उभे करते.

एखादया बालकाप्रमाणेच त्याचा स्वभाव निरागस आहे. भोवतालच्या परिस्थितीविषयी तो फारसा विचार न करता निर्णय घेतो. किंवा आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करतो. म्हणूनच द्रौपदी वस्त्रहरणाच्यावेळी युधिष्ठिरासह इतर पांडव शांत

राहिले असता तो मात्र संतापामुळे अस्वस्थ होऊन अतिशय भयानक अशा प्रतिज्ञा करतो. उदा. दुःशासनाचे नरडे फोडण्याची किंवा मांडी फोडण्याची प्रतिज्ञा त्याने त्या काळात केलेली आहे. या प्रतिज्ञा पुढे त्याने पूर्ण केल्या आहेत. वास्तविक भीम हा कितीही पराक्रमी असला तरी त्याच्या आयुष्यात कांही वेळेस कृष्णाच्याच मदतीने त्याला संकट प्रसंगातून आपली सुटका करुन घ्यावी लागली आहे. उदा. जरासंधाशी मल्लयुध्द खेळताना व दुर्योधनाशी गदायुध्द खेळताना स्वतःच्या पराक्रमापेक्षा कृष्णाच्या सल्ल्यानेच तो यशस्वी झाला आहे. तो बलरामाचा शिष्य आहे. व बलरामाच्या स्वभावाचे काही विशेष त्याच्याही स्वभावात दिसून येतात. भीम पराक्रमी असून तापट व भोळेपणामुळे त्याच्या निर्णय शक्तीस मर्यादा आहेत. तरीही इतर पांडवांपेक्षा त्याची आई कुंती किंवा पांडवांची सम्राज्ञी द्रौपदी हिला भीमाचाच आधार वाटत आला आहे. या कादंबरीतही अनेक महत्त्वाच्या प्रसंगी द्रौपदी युधिष्ठिर व अर्जुनापेक्षाही भीमाशीच विचार विनिमय करताना दिसते. एवढेच नव्हेतर मरण्यापूर्वी सुध्दा आपली मनोव्यथा भीमालाच सांगून तिने प्राण सोडलेला दिसतो. अशा रीतीने भीमाची व्यक्तिरेखा पारगावकरांनी उत्तम रेखाटलेली आहे.

धृतराष्ट्र :

कादंबरीमध्ये आलेल्या इतर व्यक्तिरेखांमध्ये दुर्योधन व धृतराष्ट्र या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत कादंबरीची सुरुवात " धृतराष्ट्राच्या मनास चैन नव्हते " [२०]

या वाक्यापासून झाली आहे. दुर्योधन, शकुनी आणि दुःशासन यांच्या

सांगण्यावरून पांडवांना वारणावताला पाठवून त्यांचा काटा काढावा या कारस्थानात धृतराष्ट्र गोवला गेला आहे. तो आंधळा आहे. म्हणून डोळ्यांवर पट्टी बांधून कृत्रिम आंधळेपणा स्वीकारलेल्या आपल्या पत्नीला म्हणजे गांधारीला सुध्दा तो विश्वासात घेत नाही. जर धृतराष्ट्राने मनात घेतले असते तर दुर्योधन व शकुनी यांचा बंदोबस्त त्याला निश्चित करता आला असता. कारण भीष्म व विदुरासारखे जेष्ठ मुत्सद्दी त्याच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले असते. परंतु पांडवांना राज्य मिळू नये ही खुद्द धृतराष्ट्राची इच्छा होती. याचे स्पष्ट वर्णन पृष्ठ १६ वर आले आहे. राज्याचे खरे मालक आपणच. केवळ आंधळेपणामुळे आपणाला राज्य भोगता येत नाही. जर युधिष्ठिराला राज्याभिषेक केला तर पांडवांच्या हातात राज्य जाईल , आणि शंभर कौरवावर अन्याय केल्यासारखे होईल या काळजीने धृतराष्ट्राचे मन कायम घेरले आहे. यामुळे कौरवांच्या प्रत्येक दुष्टकृत्यात तो सहभागी झाला आहे. धृतराष्ट्राच्या व्यक्तिरेखेचे मर्म व त्याच्या स्वभावाचे विशेष कादंबरीकाराला उमगले आहे. धृतराष्ट्र हा स्वार्थी असला तरी मनाने दुष्ट व कठोर नाही. त्यामुळे त्याचे एक मन अपराधी आहे. दुर्योधनावरील प्रेमामुळे विनाकारण पांडवांना व द्रौपदीला आपण संकटांच्या खाईत लोटत आहोत याची कुठेतरी अस्पष्ट जाणीव त्याच्या मनात आहे. थोडक्यात त्याचे व्यक्तिमत्व दुभंगलेले आहे. यामुळे जरी तो दुर्योधनाच्या पक्षात असला तरी सर्वनाशाकडे चाललेली त्याची वाटचाल त्याला मान्य नसूनही त्याच्या हेकट स्वभावामुळे संपूर्ण कुळाचा क्षय होणार हे माहीत असूनही धृतराष्ट्राला

दुर्योधनाच्या मागे फरपटत जावे लागते. लाक्षागृहात पांडवांना ठार मारण्याची योजना असो, कपटाने द्यूत खेळण्याची योजना असो, द्रौपदी वस्त्रहरण असो, कृष्णशिष्टाई असो किंवा महायुध्द छेडण्याचा निर्णय असो या सर्व घटना प्रसंगात त्याला कौरवांच्या बाजूचाच निर्णय घ्यावा लागतो. असे करताना त्याच्या मनाची जी अस्वस्था किंवा दुहेरी स्थिती होते, तिचे नेमके वर्णन कादंबरीकाराने केले आहे.

विदुर :

विदुर ही व्यक्तिरेखा पारगांवकरांनी उत्तम रेखाटलेली आहे. विदुर राजघराण्यात जन्माला आलेला पण दासीपोटी जन्म झाल्यामुळे त्याच्या वाट्यास अनेक प्रकारे दुःख आले आहे. पण ते दुःख तो संयमाने सहन करीत असतो. पाचही पांडवांना सहकार्य करणारा आणि दुर्योधन, धृतराष्ट्र, कर्ण यांना नीतिनियम शिकवणारा असा विदुर आहे. पुढे काय घडणार आहे याची अगोदरच कल्पना देणारा विदुर आहे. तो धृतराष्ट्राच्या चुका त्याला दाखवून देतो.

वारणावत म्हणजे काय, तेथे कोणत्या अडचणी येतात, तेथे कोणत्या प्रकारे राहिले पाहिजे याचे सर्व ज्ञान तो पांडवांना देतो. बारा वर्षांच्या वनवासामध्ये आपणास कोणते अडथळे निर्माण होतील याचा गोषवारा तो पांडवांना देतो. द्यूत खेळत असताना युधिष्ठिर सर्व काही हारतो. पण तो शेवटी द्रौपदीला पणाला लावतो. त्यावेळी शकुनी फासे टाकून द्रौपदीलाही जिंकून घेतो. त्यावेळी शकुनी मोठमोठ्याने हसत राहतो. सभागृहातील भीष्म, द्रोण आणि युधिष्ठिर व त्याची

भावंडे हे सर्व प्रकार पहात होते. अशा वेळी विदुराने आपले मत स्पष्ट केले आहे. तो म्हणतो, " हे सर्व काय चालले आहे ? हे नाटक बंद झाले पाहिजे. यातून संहार उद्भवतो हे कुणाच्याही कल्याणाचे नाही " [२१] असे म्हणून तो त्या सभागृहातून निघून जातो. कारण त्याला हे सर्व पाहावत नव्हते. पण शेवटी एक दिवस तो धृतराष्ट्राला म्हणतो, " राजा धृतराष्ट्रा, हे काय चालले आहे ? घूताच्या नावाखाली तू जणू हा स्वकुलाचा संहारच मांडला आहेस . द्रौपदी ही साध्वी स्त्री आहे, ती कुरु घराण्याची सून आहे. तिच्यावर अशा रीतीची आपत्ती आणून तू जणू आत्मघातच करीत आहेस . " [२२] असे बजावून सांगणारा विदुर पारंगावकरांनी मोठ्या कल्पकतेने रेखाटलेला दिसतो. श्रीकृष्णाविषयी त्याच्या मनामध्ये आदर आहे. आपल्या परीने तो पांडवांना सहकार्य करतो.

<u>दुर्योधन</u> :

धृतराष्ट्राच्या खालोखाल दुर्योधन आणि शकुनी ही कादंबरीतील महत्वाची पात्रे आहेत. वास्तविक महाभारतात दुःशासनाला दुर्योधनाच्या जवळपास महत्त्व आहे. जसे भीम - अर्जुन तसेच दुर्योधन व दुःशासन आहेत. दुर्योधनाच्या प्रत्येक दुष्टकृत्यात दुःशासन सामील झालेला आहे. या दोघांचा कपटी मामा शकुनी हा त्यांच्या या कृतीचा फक्त साक्षीदार नव्हे तर कर्ता - करविता आहे.

कोणत्याही कादंबरीतील नायक किंवा नायिका यांच्या संघर्षास तीन महत्वाची कारणे असतात. एक म्हणजे भोवतालची परिस्थिती किंवा दैवगती, दुसरा खलनायक

व तिसरा त्या नायक किंवा नायिकेच्या स्वभावातील वैगुण्य म्हणजेच परिस्थितीशी किंवा खलनायकाशी किंवा आपल्याच गुणदोषांशी जेव्हा नायक - नायिकेला संघर्ष करावा लागतो. तेव्हा त्यात त्यांना अपयश आल्यास त्यावेळी नायक किंवा नायिकेचा शोकान्त होतो.

' अयोनिजा ' या कादंबरीतील द्रौपदीचा शोकांत या तिन्ही कारणामुळे घडून आलेला आहे. द्रौपदी सम्राज्ञी असूनही भोवतालची परिस्थिती आणि नियती यांच्याशी तिला पांडवांशी विवाह होण्याच्या क्षणापासूनच संघर्ष करावा लागला आहे. दुर्योधन - दुःशासनासारखे खलनायक आयुष्यभर तिचा द्वेष करुन तिच्या नाशासाठी झगडत राहिले आहेत. या दोन्हीच्या जोडीला तिचा स्वाभिमानी स्वभाव हाही कारणीभूत आहे. कारण यदाकदाचित युधिष्ठिराप्रमाणे सहनशीलता दाखवून तिने कौरवांना माफ करुन राजसत्तेशिवाय जीवन जगण्याची तयारी दाखविली असती, तरी कदाचित महायुध्द टळले असते. परंतु कौरवांशी सर्वकष युध्द करण्याच्या तिच्या आग्रहामुळे पांडवांना महायुध्दाचा निर्णय घ्यावा लागला आहे.

अर्थात या तीन कारणांपैकी दुर्योधनाचा स्वभाव व त्याने पांडव व द्रौपदी यांचा आयुष्यभर केलेला विद्वेष हे द्रौपदीच्या शोकांताचे महत्वाचे कारण आहे. द्रौपदीने मयसभेच्यावेळी दुर्योधनाची फजिती झाल्यावर 'आंधळ्याचे पुत्र ' अशी थट्टा केल्यामुळे दुर्योधन दुखावला आहे. परंतु हस्तिनापूरच्या गादीवर आपला हक्क आहे व ती गादी पांडवांना कधीही मिळू द्यायची नाही हा त्याचा पूर्वीपासूनचा निश्चय

आहे. त्यासाठी धृतराष्ट्रावर त्याने सतत दडपण आणलेले आहे.

ही कादंबरी महाभारतावर व द्रौपदीच्या जीवनावर आधारली असल्यामुळे या कादंबरीत दुर्योधन हे एक महत्त्वाचे पात्र आहे. पांडवांच्या पूर्वी त्याचा या कादंबरीत प्रवेश झाला आहे. परंतु एकूण व्यक्तिचित्रणाचा विचार करता दुर्योधन , शकुनी , व कर्ण यांच्या व्यक्तिरेखा आकर्षक आहेत. उदाहरणार्थ - पांडवांना वारणावताला पाठविण्यासाठी धृतराष्ट्रावर दुःशासनाने दडपण आणले. वारणावताला पांडवांना पाठविण्याचा निर्णय झाल्यावर त्यांना पाठविण्यासाठी उतावीळ होणे . यावेळी भीष्म व विदुर मोडता घालतील म्हणून भीष्म व विदुर इत्यादींचा अपमान करणे, त्यांना टाकून बोलणे, द्रौपदीची स्वयंवरात मानहानी झाल्यावर पांडवांविषयी द्वेषाने पेटून उठणे, धृतराष्ट्राला सेवकांच्या चुकीने दुर्योधनानेच द्रौपदीला पणात जिंकली असे कळल्यामुळे झालेल्या आनंदाने चिडून जाणे, धृतराष्ट्राकडे पांडवांचा बंदोबस्त करण्यासाठी वारंवार आग्रह धरणे इत्यादी त्यांचे वागणे हे त्याच्या दुष्ट स्वभावाशी सुसंगतच आहे.

परंतु आधुनिक मानसशास्त्र असे सांगते की , कोणतीही व्यक्ती संपूर्ण दुष्ट म्हणजेच संपूर्ण वाईट किंवा संपूर्ण सुष्ट म्हणजे संपूर्ण चांगली असूच शकत नाही. तिचा स्वभाव संमिश्र स्वरुपाचा असतो. दुर्योधनाचा स्वभाव दुष्ट नाही तर घमेंडखोर , स्वाभिमानी , सत्तालोलुप , कौरवांच्या संख्याबलावर जादा विश्वास असणारा असा आहे. परंतु कर्णासारख्या नात्या- गोत्याशी संबंध नसलेल्या योध्याला

दिलेली वागणूक हा त्याच्या स्वभावाचा चांगला भागच म्हटला पाहिजे. पांडवांना जसा कृष्ण भेटला तसा त्याचा मार्गदर्शक शकुनी आहे. शकुनीच्या कपटीपणामुळे त्याला वेळोवेळी चुकीचे सल्ले मिळत गेले. हा सर्वस्वी त्याचा दोष मानता येणार नाही. तरीही द्रौपदीचा त्याने केलेला द्वेष हा काहीसा अकारण आहे. दुर्योधनाचा स्वभाव भीष्म व कृष्ण यांनी बरोबर ओळखलेला आहे. तसेच कृष्णाचे सामर्थ्यही दुर्योधनाने ओळखले आहे. पण पुढे ' विनाश काले विपरीत बुध्दी ' या न्यायाने कृष्णाच्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष करुन व कर्णाच्या पराक्रमावर फाजील विश्वास ठेवून त्याने काही निर्णय घेतले असले तरी कृष्णाचे सामर्थ्य त्याला अंतर्गत समजलेले आहे.

तो जसा दुष्ट आहे, तसाच स्वाभिमानी आहे. अठरा दिवसांच्या महायुध्दांत सतत अपयशाला तोंड द्यावे लागूनही त्याची जिद्द संपत नाही. शेवटी तो भीमाशी गदायुध्द करतो. युधिष्ठिराने पांडवांपैकी कोणालाही एकाशी युध्द करण्याची संधी दिलेली असताना तो इतर पांडवांशी युध्द न करता भीमाशीच युध्द करतो. गदायुध्दाच्या नियमांचा संकेत मोडून त्याला ठार मारले जाते. तरीसुध्दा तो नामोहरम होत नाही. मरणाच्या दारात असताना सुध्दा पांडवांविषयीचा त्याचा राग शांत होत नाही. तो अश्वत्थाम्याला सेनापती करतो व अश्वत्थामा पांडवांच्या शिबिरावर हल्ला करुन द्रौपदीच्या पाच मुलांसह पांडवांची सर्व सेना नष्ट करितो, हे सर्व समजल्यावरच आपले प्राण सोडतानाचे वर्णन लेखकाने पुढील शब्दात केले आहे.

" अश्वत्थाम्याचे हे शब्द दुर्योधनाच्या क्षीण झालेल्या कानांमधून त्याच्या हृदयापर्यंत

पोहोचले आणि त्या तशा अवस्थेतही त्याच्या मृतवत चेहऱ्यावर समाधान पसरले. त्याने दृष्टीचा एक कटाक्ष मोठ्या कष्टाने अश्वत्थाम्याकडे टाकला आणि त्याच्या शरीरातून त्याचे प्राण निघून गेले." [२३] दुर्योधनाने कळू लागल्यापासून मरेपर्यंत वैराचे व्रत आकंठ चालू ठेवले होते व ते त्याच्या बरोबर नष्ट झाले.

कर्ण :

वास्तविक कर्ण पांडवांचा ज्येष्ठ बंधू, जसा पांडव आणि द्रौपदी यांचा परस्परसंबंध आहे, जवळ-जवळ तेवढाच कर्णाची व्यक्तिरेखाही द्रौपदीच्या जीवनाशी किंवा भवितव्याशी निगडीत आहे. कुंतीचा मुलगा असतानाही व अर्जुना इतकाच धनुर्धारी असतानाही केवळ नियतीमुळेच किंवा त्यावेळच्या समाज व्यवस्थेमुळेच त्याला आपल्या आयुष्यात फार मोठी मानहानी सहन करावी लागली आहे.

कर्ण हा दुर्योधनाचा मित्र, शकुनी प्रमाणेच त्याचा साथीदार आहे, परंतु संपूर्ण कादंबरीत दुर्योधन व कर्ण यांचे प्रत्यक्ष संभाषण किंवा यांच्या मित्रत्वाचे वर्णन फारसे येत नाही.

कर्णाचे कादंबरीत दोन ठिकाणी परिणामकारक वर्णन येते पृष्ट ५५ वर ज्यावेळी " मी सूतपुत्राला वरणार नाही " असे द्रौपदी तो मत्स्यभेद करीत असताना त्याला सांगते, त्यावेळी व पुढे अर्जुनाकडून पराभव झाल्यावर " तुझ्या-सारख्या समोर युध्द करणे मला कमीपणाचे आहे " [२४] असे सांगून अर्जुनाने पण जिंकल्यावर त्याच्याशी युध्द करणे नाकारणे, हे प्रसंग उत्तम वठले आहेत. ते

कादंबरीच्या प्रारंभी घडले आहेत. त्यनंतर पृष्ट १७० वर कृष्ण कर्णाला बाजूला घेऊन त्याला जेव्हा त्याचे जीवनरहस्य सांगतो, त्यावेळी त्याने केलेले वर्तन, ज्येष्ठ पांडवांचा मान मिळत असताना सुध्दा तो नाकारून कोणत्याही परिस्थितीत दुर्योधनाबरोबर राहण्याचा त्याने घेतलेला निर्णय इत्यादींच्या प्रसंगी कादंबरीकाराने केवळ तीन - चार वाक्यात केलेल्या वर्णनावरून कर्णाच्या स्वभावाचे मोठेपण कळून येते. कर्णाने अतिशय भावनाप्रधान होऊन कृष्णाजवळ आपले मन मोकळे केले. आणि तो पुन्हा कृष्णाशी एकही वाक्य न बोलता रथातून खाली उतारला. आणि मोठ्या वेगात पावले टाकीत शहराकडे परतला. त्याने जाताना एकदाही मागे वळून पाहिले नाही. कर्ण किती निश्चयी स्वभावाचा होता हे यावरुन दिसून येते.

दुःशासन :

दुर्योधनाच्या खालोखाल दुःशासन हा महाभारतातील एक महत्वाचा खलनायक आहे. परंतु त्याच्या व्यक्तिरेखेकडे लेखकाचे संपूर्ण दुर्लक्ष झाले आहे. फक्त पृष्ठ १२४ व पृष्ठ १२५ वर दुर्योधनाच्या सांगण्याप्रमाणे दुःशासन द्रौपदीला अर्धनग्न अवस्थेत भर सभेत फरफटत आणतो. हा त्याचा पराक्रम सोडला तर इतर कोणत्याही प्रसंगात कादंबरीकाराने त्याचे अस्तित्व दाखविलेले नाही. वास्तविक दुर्योधनाच्या सेवकाप्रमाणेच भीम आणि दुःशासन युध्द हेही महत.त्वाचे आहे. भीमाने दुःशासनाची छाती फोडून त्याचे रक्त पिण्याची भीषण प्रतिज्ञा केली होती. या महत्त्वाच्या प्रसंगाचे वर्णनही " एखादया सिंहाने आपल्या लक्ष्यावर झेप घ्यावी आणि

त्याच्या नरडीचा घोट घ्यावा, असे भीमाने दुःशासनाचा कंठ-नळा फोडला आणि त्याच्या उष्ण उष्ण रक्ताचे घोट घेऊन त्याने द्यूत प्रसंगी केलेली आपली प्रतिज्ञा पूर्ण केली " [२५] असे थोडक्यात वर्णन येते.

सारांश : दुःशासनाची या कादंबरीतील व्यक्तिरेखा अगदी प्रभावशून्य वाटते.

कुंती :

कुंती ही व्यक्तिरेखा गांधारीप्रमाणे पारगांवकरांनी रेखाटलेली आहे. गांधारीप्रमाणे कुंतीची अवस्था झाली आहे. कुंतीचे सारे आयुष्य सम्राज्ञी असूनही अस्थिर व दुःखमय आहे. कुमारी मातेचे दुःख तिला भोगावे लागले आहे. परंतु संपूर्ण पृथ्वी जिंकणाऱ्या पांडवांची आई म्हणूनही तिला फारसे सुख मिळाले नाही. नंतरही आयुष्यभर, निराशा व दुःख याशिवाय तिच्या वाटयास काहीच आलेले दिसत नाही. शेवटी सुध्दा ती पांडवांबरोबर राहण्यापेक्षा धृतराष्ट्र व गांधारी बरोबरच राहण्याचे पसंत करते. " जीवन संपत आहे आणि कृतार्थ होत आहे असे म्हणून गांधारी व कुंती यांनी अत्यंत शांत चित्ताने आणि मनाच्या अविचल अवस्थेत चालत चालत जाऊन वणव्याच्या आगडोंबाशी जाऊन भिडल्या. त्यानी एकामागोमाग एक अशा वणव्यात उड्या घेतल्या व तिथेच त्यांच्या जीवनाचा पूर्णविराम झाला. " [२६] कुंती सहनशीलतेचे उत्तम उदाहरण आहे.

गांधारी :

कौरवपांडवांच्या प्रमुख पात्रांबरोबरच गांधारी या महत्त्वाच्या व्यक्तिरेखेचा

उल्लेख करावा लागेल. गांधारीचे दर्शन पहिल्याच प्रकरणात घडते. महाभारतातील एकेका पर्वाच्या गांधारी, कुंती व द्रौपदी या खरे तर नायिकाच आहेत. धृतराष्ट्रासारख्या आंधळ्या पतीशी गाठ पडल्यावर गांधारीनेही जाणून-बुजून आंधळेपण स्वीकारलेले आहे. दुर्योधन, दुःशासनासारख्या दुष्ट व अतिरेकी पुत्राशी गाठ पडल्यामुळे व मुलांवरील प्रेमामुळे स्वार्थी व आत्मकेंद्री बनल्याने धृतराष्ट्राच्या सहवासात वावरल्यावर गांधारीचे गुण माती मोल झाले आहेत. तिला धृतराष्ट्र व कौरव यांनी घेतलेल्या निर्णयामागे फरफटत जावे लागते. तरीही द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी तिने दाखविलेले धाडस कौतुक करण्यासारखे आहे. अनेकवेळा कौरवांना सावरण्याचा प्रयत्न करूनही दैवाची साथ तिला मिळालेली नाही. यामुळे आयुष्यभर वैराण जीवन तिला जगावे लागले आहे. तिचा शेवटही एका वणव्यात धृतराष्ट्राबरोबर उडी टाकून झाला आहे. अशा रीतीने गांधारी ही व्यक्तिरेखा पारगांवकरांनी उत्तम रेखाटली आहे.

महाभारतासारख्या लहानसहान व्यक्तिरेखांना महत्त्व देणाऱ्या ग्रंथावर आधारित अशा या कादंबरीत एकूण व्यक्तिचित्रणाकडेच कादंबरीकाराला फारसे लक्ष पुरविता आलेले नाही. वास्तविक या कादंबरीच्या प्रस्तावनेत या व्यक्तिचित्रणाचे महत्व खुद्द पारगांवकरांनीच स्पष्ट केले आहे. ते म्हणतात " महाभारतात जेवढे म्हणून जीवन आलेले आहे त्या प्रत्येकाच्या मागे एक भव्यतेचे वलय आहे. सामान्य अथवा असामान्य नाट्यात्मक घटनेत गुंतवून एकादे सरळसोट जीवन रंगविले किंवा एखादी

घटनात्मक गोष्ट केली असे महाभारतात कोठेही घडलेले नाही. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात काही तरी आदर्श आहे, एखादी आकांक्षा आहे, एखादे लोकविलक्षण ध्येय आहे महाभारतातील कोणत्याही व्यक्तीने सुटा जन्मच घेतलेला नाही. कोणतेना कोणते तरी एखादे वलय त्याच्या जीवनाला व्यापून राहिलेले आहे. " [३७] याचा प्रत्यय ही व्यक्तिचित्रे न्याहाळल्यावर खचितच येतो.

याशिवाय भीष्माचार्य, बलराम , द्रुपद, द्रोणाचार्य, अश्वथामा, विराट , कीचक, नारदमुनी, जयद्रथ, शकुनी, सुभद्रा, उत्तरा, अभिमन्यू अशा अनेक व्यक्तिरेखांचे उल्लेख कादंबरीत आले आहेत. या शिवायही छोट्या-मोठ्या पात्रांची ये-जा कादंबरीत झाली आहेच. परंतु यापैकी वाचकांच्या लक्षात येण्यासारखे कोणतेही पात्र वाटत नाही. थोडक्यात महत्वाच्या पात्राप्रमाणे दुय्यम पात्रेही कमकुवत वाटतात. या कादंबरीतील कौरव पांडवांच्या वैराचे वर्णन घडविणे व तेही त्यांच्या व्यक्तिचित्रणातून घडविणे, त्यांच्या जीवनातील सुख-दुःखाच्या छाया प्रकाशाचा लपंडाव रंगविणे हे कादंबरीकाराचे प्रमुख उद्दिष्ट होते.

जीवन दर्शन :

'अयोनिजा ' ही कादंबरी पौराणिक आहे. त्यातही महाभारतावर आधारलेली आहे. शिवाय ' द्रौपदी ' ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे तसेच ही कादंबरी कौरव पांडवांच्या परस्पर संबधातील अनेक महत्वाच्या प्रसंग , घटनांवर आधारलेली आहे. या कादंबरीतील सर्व महत्वाच्या व्यक्ती या एका प्रसिध्द राज

घराण्यातील आहेत. त्यांचे व्यक्तीचित्रण करताना स्वाभाविकच तत्कालीन समाजजीवनाचा उल्लेख होणे अपरिहार्य आहे. विशेषतः पांडव हे पराक्रमी असल्यामुळे त्यांना अनेक युध्द प्रसंगातून जावे लागले आहे. त्यावेळची युध्दपध्दती, त्यावेळचे सैन्य, शस्त्रे, इत्यादी वर्णनातून महाभारतकालीन युध्द प्रसंगासंबंधीची माहिती मिळते. कौरव पांडवांमध्ये अठरा दिवस महायुध्दाखेरीज इतर अनेक छोटया- मोठ्या चकमकींची व युध्दांची वर्णने या कादंबरीमध्ये आली आहेत. पण ती फारशी परिणामकारक वाटत नाहीत. महाभारतकालीन राजवैभवाचे वर्णन प्रचंड राजवाडे, राजसभा, द्रौपदी स्वयंवरासारखे प्रसंग, इत्यादी वर्णनातून तत्कालीन जीवनाचे राजवैभव रेखाटण्याचा कादंबरीकाराने प्रयत्न केला आहे. याशिवाय पांडवांच्या प्रजाजनांची अनेक वर्णने प्रसंगानुसार आलेली आहेत. राजसूय, अश्वमेध यासारख्या महायज्ञांची वर्णने, तत्कालीन धार्मिक जीवन, होमहवने, वर्णाश्रम, धर्मानुसार ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादी वर्णियांची वागण्याच्या पध्दती, त्यावेळचे नीतिनियम, त्यावेळची जाती व्यवस्था, पराक्रमापेक्षाही जन्मजात अवस्थेला महत्त्व देण्याची पध्दत, त्यामुळे कर्णासारख्या महापराक्रमी व्यक्तीवर त्याचा झालेला परिणाम, विदुरासारख्या राजघराण्यात जन्म झालेल्या व्यक्तीला केवळ दासीपोटी जन्म घ्यावा लागल्यामुळे त्याच्या वाटयास आलेली अवहेलना इत्यादी अनेक प्रसंगातून त्यावेळच्या चालीरीती, राजकीय शिष्टाचार, रूढी, परंपरा, प्रतिष्ठाविषयक संकेत इत्यादी मधून तत्कालीन समाजजीवनाचे दर्शन घडते. त्यावेळच्या वेशभूषा, आहार, सण-समारंभ, व्रतवैकल्ये,

खेळ, करमणुकीचे प्रकार इत्यादींचेही धावते वर्णन कादंबरीत निरनिराळ्या घटना प्रसंगानुसार येणे अपरिहार्य होते व तसे ते आलेले आहे.

संघर्ष :

या कादंबरीतील संघर्षाला तीन पैलू आहेत. दुर्योधन, दुःशासन इत्यादी कौरवांनी पांडवांना पराजित करण्यासाठी कोणत्याही पातळीवर जाऊन त्यांचा केलेला द्वेष , दुसऱ्या बाजूने पांडवांनी विशेषतः भीम , द्रौपदी व अर्जुन यांनी त्यांच्या सतत केलेल्या अपमानाचा श्रीकृष्णाच्या मदतीने घेतलेला कौरवांचा बदला आणि तिसऱ्या बाजूने युधिष्ठिराचा स्वभाव, वास्तविक दुर्योधन व युधिष्ठिर ही दोन टोके आहेत. व महाराणी द्रौपदी हाच या संघर्षाचा केंद्रबिंदू आहे. या तिघांच्याही शोकांताने कादंबरीची अखेर होते. कादंबरीच्या सुरुवातीपासून कादंबरीत घडणाऱ्या घटना प्रसंगांची गुंफण करुन प्रारंभ, मध्य व अंत या बिंदूतून प्रवास करून हा संघर्ष रंगविण्याचा प्रयत्न कादंबरीकाराने केला आहे. कादंबरीच्या प्रारंभी पांडवांना वारणावताला पाठविण्याच्या कारस्थानाने कादंबरीतील संघर्षाला सुरुवात होते. पुढे पांडवांचे वारणावताच्या प्रसंगातून वाचणे, द्रौपदी स्वयंवर, त्यानंतर द्रुपद राजाचा पांडवांना मिळालेला पाठिंबा, धृतराष्ट्राला मनाविरुध्द राज्याची करावी लागणारी वाटणी, वाटयास आलेल्या राज्याचा विस्तार करण्यास पांडवांना मिळालेले यश, कृष्ण आणि बलराम यांचा भरभक्कम पाठिंबा, राजसूय यज्ञामुळे युधिष्ठिराला मिळालेले सम्राटपण, मयसभेच्या निर्मितीमुळे पांडवांची झालेली प्रसिध्दी, द्रौपदीला

मिळालेले महाराणी पद, भीम - अर्जुनाचा पराक्रम, प्रथम द्रौपदीने सूतपुत्राला वरणार नाही म्हणून कर्णाचा केलेला अपमान व नंतर मयसभेच्या भेटी प्रसंगी दुर्योधनाचा भीम - द्रौपदीने केलेला उपहास या सर्व घटना, प्रसंगांनी कादंबरी क्रमाक्रमाने संघर्ष बिंदूकडे जाते.

शकुनीच्या कपट द्यूताचा आधार घेऊन द्रौपदीसह पांडवांना दास बनविणे या घटनेने व भर राज्यसभेत द्रौपदीचे वस्त्रहरण करण्याच्या प्रयत्नामुळे हा संघर्ष शिगेस पोहचतो. इथूनपुढे पांडवांचा वनवास, अज्ञातवास, कीचकवध, जयद्रथाकडून द्रौपदीचा झालेला विनयभंग, वनवासाच्या काळात अर्जुनाने मिळवलेली दिव्यास्त्रे, वनवासानंतरही कृष्णाच्या मार्गदर्शनामुळे पांडवांना मिळालेली प्रतिष्ठा या सर्व घटनांचा अपरिहार्य परिणाम पांडवांनी आपले राज्य परत मागण्यात होतो. यावेळी सुध्दा जरी कौरवांनी पाच गावे दिली तरी तडजोड करावी असेच युधिष्ठिराचे मत असते. पण भीम व द्रौपदी यांचा प्रक्षोभ व कृष्णाचे अचूक मार्गदर्शन यामुळे कृष्णशिष्टाईला तो तयार होतो. परंतु सुईच्या अग्रावर मावेल एवढी सुध्दा जमीन मी देणार नाही. या दुर्योधनाच्या उर्मट उत्तरामुळे वाटाघाटी फिसकटतात व शेवटी १८ अक्षौहिणी सैन्याच्या मदतीने उभय बाजूत तुंबळयुध्द होते. कौरवांना जबरदस्त हार पत्करावी लागते. युध्दाच्या प्रारंभी पांडवांचा सेनापती, अर्जुन हा कुलक्षय व ज्येष्ठांचा अनादर ही दोन कारणे देऊन युध्द करण्याचे नाकारतो . त्याची समजूत घालण्यासाठी भगवान श्रीकृष्णाला अठरा अध्याय गीता सांगावी लागते.

कौरवांचा संपूर्ण पराभव होऊन हा सूडाचा प्रवास थांबत नाही अश्वत्थाम्याकडून द्रौपदीच्या पाचही पुत्रांचा वध करण्यात येतो. उत्तरेच्या पोटी असलेला परिक्षित सोडून जवळ-जवळ पांडवांचाही निर्वंश होतो. या युध्दानंतर पांडव पुन्हा एकदा पृथ्वीचे सम्राट होतात. अनेक वर्षे राज्य करतात. कृष्णाचा पाठिंबा मिळतो. परंतु शेवट मात्र शोकांतच होतो. जो आंधळा धृतराष्ट्र पांडवांच्या आंधळ्याद्वेषाला कारण झाला तो आयुष्याच्या शेवटी गांधारी आणि कुंती यांच्यासह आगीच्या वणव्यात जळून भस्म होतो. एका पारध्याकडून भगवान श्रीकृष्णाला मृत्यू येतो व पांडवांच्या महानिर्वाणात पहिला बळी द्रौपदीचाच जातो. अशा रीतीने पहिल्या प्रकरणात कौरवपांडवांच्या मतभेदातून निर्माण झालेला हा संघर्ष या मतभेदाचे प्रमुख कारण असलेल्या द्रौपदीच्या अंताने समाप्त होतो.

<u>व्यक्ती व्यक्तीतील परस्पर संबंध</u> :

वि. शं. पारगांवकरांना या कादंबरीतून प्रत्येक पात्र दुसऱ्या पात्राशी कसे निगडीत आहे. ते एक दुसऱ्यांना कसे सहकार्य करते याची अप्रत्यक्ष जाणीव कादंबरी वाचताना वाचकाला करून दिली आहे. यातील प्रत्येक पात्र एकमेकाशी निगडीत आहे. उदा. द्रौपदी - कृष्ण, द्रौपदी - कुंती, द्रौपदी - पाचही पांडव, धृतराष्ट्र - दुर्योधन, कर्ण - दुर्योधन, इत्यादी पात्रे एकमेकांशी जवळीक साधताना दिसतात. उदा. द्रौपदी - श्रीकृष्ण, द्रौपदी - अर्जुन, द्रौपदी - भीम, द्रौपदी - युधिष्ठिर इत्यादी पात्रे एकमेकाशी संबंधित अशी आहेत.

<u>द्रौपदी - कृष्ण</u> :

द्रौपदी व कृष्ण महाभारतात एकाच वेळी अवतीर्ण होतात. या दोन्ही व्यक्तिरेखा पारगावकरांनी उत्तम रेखाटल्या आहेत. यांचे परस्पर संबंध फार घनिष्ठ आहेत. द्रौपदी आपले संपूर्ण सुख - दुःख श्रीकृष्णाजवळ अगदी मनमोकळेपणाने सांगते. त्याचे निराकरण कृष्ण करीत असतो. तिच्या जीवनात कोणते प्रसंग येतील, काय घडेल याची जाणीव अगोदरच तो तिला करून देतो. तिच्या संपूर्ण सुख - दुःखात श्रीकृष्ण सहभागी होतो. एकूण तिच्या जीवनाचा उलगडा कृष्णाच्या तोंडून ती ऐकते. त्यामुळे द्रौपदी व श्रीकृष्ण यांचे संबंध फार जवळचे आहेत.तो तिचा पाठीराखा असल्यामुळे तिच्या दुःखाच्यावेळी हजर राहतो. आणि त्या दुःखाचे निराकरण करतो.

पाच पांडव कसे आहेत याची जाणीव ही तो करून देतो. द्रौपदीनेही श्रीकृष्णाचा आदर राखला आहे. तिच्या मनामध्ये कृष्णाबद्दल प्रेम आहे. आपले संपूर्ण दुःख ती त्याला सांगते. ज्यावेळी युधिष्ठिर व भीम युध्द टाळण्याचे सांगतात त्यावेळी ती कृष्णाला विनंती करून युध्द करण्यास सांगते. आपला प्रत्येक पती कसा आहे याची जाणीव ती कृष्णाला करून देते. तिला एकूण आयुष्यात येणारे दुःख श्रीकृष्णच निराकरण करीत असल्यामुळे तिचे जीवन इतरांपेक्षा वेगळे ठरते.

द्रौपदी - अर्जुन :

द्रौपदी व अर्जुन यांचे परस्पर संबंध फार जुने आहेत. पण दैवयोगाने ती फक्त अर्जुनाची पत्नी न होता पाचही पांडवांची पत्नी होते. खरे तर अर्जुनाशी तिला लग्न करावयाचे होते. असा तिचा निर्धार पूर्वीपासूनच होता. तिचे वडील

राजा द्रुपद यांचीही तीच इच्छा होती. अर्जुनासारखा शूर योध्दा, पराक्रमी पुरुष या जगात आज तरी दिसत नव्हता. धनुर्विद्येतील त्याचे नैपुण्य अलौकिक होते. शिवाय त्याचा जन्म कुरुकुलातील होता. हे कुल श्रेष्ठ समजले जाते. त्यादृष्टीने तो कुलवंतच होता शिवाय दुसरीकडून त्याचे नाते यादव कुळाशी होते.

पुढे पांडव कुंतीसह लाक्षागृहात जळून भस्म झाले ही बातमी जेव्हा सर्वत्र पसरली तेव्हा कुमारी द्रौपदीस अर्जुनाच्या मृत्यूमुळे भयंकर धक्का बसलेला होता. पण राजा द्रुपदाने गुप्तचर पाठवून या गोष्टीची शहानिशा करून पाहिली होती. पांडव जिवंत आहेत आणि वेषभूषा बदलून भीतीने दिवस कंठत आहेत. अशी बातमी द्रुपदाला समजते. यावेळी द्रौपदीला आनंद होतो. इतर राजांपेक्षा अर्जुना-बरोबर विवाह करणे हे तिला पसंत होते. अर्जुनही द्रौपदीच्या सौंदर्यामुळे भारावून जातो. अर्जुनाशिवाय हे स्वयंवर कोणीच जिंकू नये असे द्रौपदीला वाटते आणि तसे तिच्या मनानुसार होते. पण कुंतीच्या आणि कृष्णाच्या विचारानुसार तिला पाचही पांडवांशी लग्न करावे लागते. ती इतर पांडवांपेक्षा अर्जुनाशी एकनिष्ठ होते. त्याच्या सुख - दुःखात सहभागी होते. आपले प्रेम व्यक्त न करता ती शांतपणे जीवन कंठत राहते.

अशारितीने अर्जुन व द्रौपदी यांचे संबंध तसे फार जवळचे आहेत. पण नियतीमुळे दोघांना एकमेकांपासून अलिप्त राहावे लागते.

<u>द्रौपदी - भीम</u> :

द्रौपदी व भीम यांचे परस्पर संबंध फार जवळचे आहेत. याचे कारण, भीम द्रौपदीच्या प्रत्येक अडचणीला धावून जातो. एक दिवस जटासुर द्रौपदीच्या आश्रमावर पळत ठेवतो आणि द्रौपदीशी चाळे करण्यास सुरुवात करतो. त्यावेळी भीम शिकारीसाठी आश्रमाबाहेर गेला होता. नकुल, सहदेव आणि युधिष्ठिर फक्त द्रौपदी जवळ आश्रमात होते. जटासुराला या तिघांची मुळीच भीती नव्हती त्याला या तिघांचा वध करुन द्रौपदीस घेऊन जावयाचे होते. परंतु भीमाच्या शौर्यामुळेच त्याला मरण पत्करावे लागते. त्याचप्रमाणे ' जयद्रथ ' हा धृतराष्ट्राचा जावई. त्याचे लक्ष द्रौपदीवर जाताच त्याची कामवासना जागी होते. यातूनही द्रौपदीला सावरण्याचा प्रयत्न भीम करीत असतो. अशारीतीने द्रौपदीच्या प्रत्येक दुःखात, अडचणीच्या वेळी तो धावून येतो. द्रौपदीही आपल्या मनातील संपूर्ण विचार इतर पांडवांपेक्षा भीमालाच सांगते. तिची भीमावर मर्जी असते. अतिशय प्रामाणिकपणे भीम द्रौपदीबरोबर वागत असतो. भीमाचे शौर्य तिच्या लक्षात आहे. ज्या- ज्या वेळी अडचण पडेल त्या वेळी ती भीमाचा धावा करते. भीम कृतीवीर आहे. कृती करणे, कृती करण्यात शौर्य दाखवणे, तसेच ऐश्वर्याने तृप्त होणे, बलाने आत्मतृप्त होणे आणि वैभवात न्हाऊन निघणे यामुळे तो एखादया देवपुत्राप्रमाणे भासत होता याची सर्व जाणीव द्रौपदीला होती. तो इतर पांडवांपेक्षा बलदंड आहे. द्रौपदीचा प्रत्येक शब्द तो ऐकतो. द्रौपदी व भीम यांचे परस्पर संबंध किती अतूट होते याची जाणीव त्यांच्या संवादावरुन स्पष्ट होते.

' भीमा, तू अत्यंत शूर आणि बलवान व्यक्ती आहेस पण -'

'द्रौपदी, मी बलवान आणि शूर आहेच परंतु तुझ्या तोंडी हा पण कशासाठी?'

'भीमा हा पण नेहमीच सावधपणाचे प्रतीक म्हणून येतो.'

'म्हणजे तुला असे म्हणावयाचे आहे काय की मी सर्व काही परंतु सावध नाही।'

'माझ्या म्हणण्याचा तसा अर्थ नाही रे, अर्थ एवढाच की तू सावधपणापेक्षाही शूर आहेस.' [२८]

अशा रीतीने दोघांना एकमेकांबद्दल असणारा आदर, प्रेम संवादातून स्पष्ट होते. द्रौपदीच्या वरील प्रश्नांतून भीमाला हसू येते. ती म्हणते तुझ्या सारखा निर्भय आणि शूर पती म्हणून लाभावा हे माझे भाग्यच. परंतु माझ्यामध्ये असलेल्या या बधिर करणाऱ्या नाजूक भावना उद्भवतात. त्याचेही परिमत्य करण्याचे सामर्थ्य तुझ्यामध्ये आहे अशी जाणीव ती भीमाला करून देते.

आपल्या मनातील भावना, प्रेम, दुःख, अडचणी या सर्व ती भीमाला बोलून दाखवते. ती इतर पतींपेक्षा भीमाबरोबर अगदी मनमोकळेपणाने बोलते. तिला भीमाबरोबर बोलताना कोणताच संकोच वाटत नाही. इतके त्यांचे नाते जवळचे आहे.

भाषाशैली :

ही कादंबरी पौराणिक आहे. एवढेच नव्हे तर व्यासासारख्या महाकवीच्या 'महाभारत' या सिध्दहस्त महाकाव्यावर आधारली आहे. मूळ ग्रंथाचे लेखन संस्कृतमधून झाले असल्यामुळे संस्कृतप्रचूर भाषाशैलीचा उपयोग पारगांवकरांनी केला असता तरी चालले असते. त्याचप्रमाणे तत्कालीन भाषेतील संस्कृत म्हणी, वाकप्रचार

यांचा सुरेख मराठी अनुवादही त्यांना करता आला असता. मूळातील श्लोकांचा साधा अनुवाद जरी काही महत्त्वाच्या प्रसंगी त्यांनी पात्राच्या तोंडी योजला असता तरी त्यांचे लेखन थोडेफार प्रभावी झाले असते.

उदा. ग. दि. माडगूळकरांनी गीत - रामायणाचे लेखन करताना रामायणातील वाल्मिकींच्या अनेक संस्कृत श्लोकांचा सफाईदार अनुवाद केला आहे.

वि. शं. पारगांवकरांनी तसा काही प्रयत्न केला नाहीच पण पात्रांच्या परस्पर संभाषणातही गद्य आणि विसाव्या शतकातील भाषेचा उपयोग केला आहे.

उदा. पृष्ठ २२ वर विदुर व युधिष्ठिर यांचा संवाद चालू आहे. यामध्ये युधिष्ठिरांच्या तोंडची भाषा एखादया सामान्य माणसाची भाषा वाटते. वास्तविक तो राज्याचा युवराज आहे.

पृष्ठ २३ उदा. " योग्य काय, अयोग्य काय याचा प्रत्येक माणसाने स्वतःच विचार केला पाहिजे. " [२९]

पृष्ठ २४ उदा. " होय महाराज, ते कर्तव्यच आहे , आणि यातून मी कोणता मार्ग अनुसरावा याविषयी आपणच मला मार्गदर्शन करावे. " [३०]

पृष्ठ २७ वर " ती सर्व जबाबदारी मी पत्करतो. कुंती वहिनीला मी तुमच्याबरोबर येण्यास तयार करतो. तू हे नेहमी लक्षात ठेव की, हा जो घाट धृतराष्ट्राने आणि दुर्योधनाने घातला आहे तो तुम्हाला एक शह आहे. आणि या

शहास काटशह देताना तुमच्या चित्तवृत्ती अगदी स्थिर हव्यात एवढेच यावेळी मी तुला सांगतो." [३१]

संवाद :

वास्तविक निवेदन पध्दतीत दोन व्यक्तीतील संभाषणाचा वापर निवेदन अधिक प्रभावी करता येतो. नाटकातील संवाद आणि कादंबरीतील संवाद यामध्ये फरक असतो. कारण नाटकातील पात्रे प्रेक्षकाच्या डोळ्यांसमोर असतात. त्यामुळे त्यांचे संवाद प्रेक्षकांपर्यंत प्रत्यक्षच पोहचतात. परंतु कादंबरीतील व्यक्तीचित्रण अमूर्त असल्यामुळे कादंबरीमध्ये पात्रांच्या तोंडी योजिलेल्या संवादांचे स्वरूप निराळे असावे लागते तसे ते आहे.

उदा.

धृतराष्ट्र :

द्यूत हा राजघराण्यांतील एक प्रतिष्ठित खेळ आहे. त्याने मनोरंजन होणे आणि थोडेफार व्यावहारिक ज्ञानही मिळते या सर्व गोष्टी लक्षात घेऊन मी द्यूत खेळण्याची कल्पना मांडली होती. परंतु दोन्ही बाजू ईर्षेला पेटल्या,

घडू नये ते घडले. परंतु आता तुझ्या बोलण्यावर आणि तुझ्या शहाणपणावर मी प्रसन्न आहे. तुला मी वर देतो. यावर तुला काय मागावयाचे असेल ते माग ."[३२]

द्रौपदी : " आपण वर देतच आहात तर त्या वराने मी माझे भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव हे चार पती दास्यातून मुक्त होवोत अशी मागणी करते. "[३३]

धृतराष्ट्र : " तुझे चार पती मुक्त झाले, तू खरोखर साध्वी आहेस, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आणि आणखी एक वर मी तुला देतो. "[३४]

द्रौपदी : " पाच पांडवांतील श्रेष्ठ बंधू आणि राजसम्राट तसेच धर्मज्ञ म्हणून श्रेष्ठ असणारे युधिष्ठिर यांनाही दास्यातून मुक्त करावे अशी मी मागणी करते. "[३५]

या कादंबरीच्या पानोपानी असे अनेक अर्थपूर्ण संवाद पसरले आहेत. अर्जुन कर्णाचा वध करतो. त्यावेळी कर्ण व अर्जुनामधील झालेला संवाद किंवा दुर्योधनाच्या मांडीखाली घाव करून गदायुध्दात भीम दुर्योधनाचा वध करतो. त्यावेळी कर्ण, अर्जुन , भीम, दुर्योधन यामध्ये झालेला संवाद असाच परिणामहीन आहे --

उदा. कर्ण: " अर्जुना, मी निःशस्त्र होऊन रथाखाली उतरलो आहे. धर्माने युध्द करावयाचे असल्यास तू माझ्या रथाचे चाक उध्दरेपर्यंत शरसंधान करू नकोस." [३६]

भीम : " दुष्टा, आता धरणीवर विव्हळत पडून मृत्यूची वाट पाहण्याखेरीज तुझ्या हातात काही उरले नाही "[३७]

भीम व दुर्योधन यांच्यातील संवाद भीमाची विजयी वृत्ती जशी स्पष्ट करतो तशीच दुर्योधनाने त्या विजयाची दाखवून दिलेली सीमारेषाही स्पष्ट करतो.

वरील सर्वच उदाहरणे द्रौपदी व कृष्ण यांचे संवाद देखील उठावदार आहेत.

कृष्ण : " द्रौपदी तू एकटी नाहीस, एकटेपणाचे दुःख तुला मुळीच होता उपयोगी नाही, तू द्रूपदाची कन्या, पाच पांडवांची भार्या, कुरुराज्याची महाराणी, कुंतीची लाडकी सून आणि माझी सखी आहेस . " [३८]

द्रौपदीच्या मनातील खळबळ व कृष्णाने तिला दिलेला धीर संवादातून हुबेहुब आविष्कृत झाला आहे.

कृष्ण : " कृष्णे, हे सर्व तुझ्या मनाचे खेळ आहेत. उलट तुझ्यामुळेच पांडवांची एकी कायम राहणार आहे. तू याविषयी मनात थोडीदेखील शंका घेऊ नकोस . " [३९]

शीर्षक :

कादंबरीत " अयोनिजा " हे एक प्रतीक म्हणून आले आहे. अयोनिजा म्हणजे जिचा जन्म मानवी योनीतून झालेला नाही अशी स्त्री. आणि ही स्त्री म्हणजे द्रौपदी. द्रौपदी राजा द्रुपदाची कन्या, श्रीकृष्णाची बहीण (सखी ) आणि पांडवांची सम्राज्ञी आहे. तिच्या जन्माची कथा एका चमत्काराशी निगडीत आहे. तिच्या जन्माप्रमाणेच तिचा मृत्यूही अलौकिकच आहे .

प्रारंभ :

"अयोनिजा" या कादंबरीतील लेखन महाभारतासारख्या अतिभव्य ग्रंथावर आहे व द्रौपदीच्या अनेक पैलू असलेल्या नायिकेच्या जीवनाचा विस्तीर्ण पट कादंबरीमध्ये दाखविला आहे. कादंबरीच्या सुरुवातीलाच पांडवांची व द्रौपदीची स्वयंवर प्रसंगी पडलेली गाठ या प्रसंगापासूनच कथानकाची खरी सुरुवात होते. त्याचप्रमाणे धृतराष्ट्राच्या मनाची होणारी चलबिचल आणि दासीकडून धृतराष्ट्राला मिळणारा संदेश तिच्या तोंडी लेखकाने सुरुवातीलाच घातला आहे - " महाराजांना अंतःपुरात घेऊन जाण्यासाठी ही दासी आहे. आज्ञा व्हावी महाराज " [४०] या अवतरणाने प्रारंभ झालेल्या आणि धृतराष्ट्राने उच्चारलेल्या या पहिल्या वाक्यातून कादंबरीची सुरुवात होते.

" फार उशीर तर झाला नाही ना ? किती वेळ मी इथे आहे ? " [४१]

शेवट :

श्रीकृष्ण व्दारकेस जाण्यापूर्वी द्रौपदी, जीवन कसे जगले व भोगले पाहिजे हे तत्वज्ञान सांगतो. त्याचबरोबर अर्जुनाला काही महत्वाचे संदेश देतो. कादंबरीच्या शेवटी कृष्णाची अखेर दाखविली आहे. एका पारध्याचा बाण लागण्याचे निमित्त होऊन श्रीकृष्ण हे जग सोडतो.

धृतराष्ट्र, गांधारी व कुंती व त्याच बरोबर पांडवही महानिर्वाणाला निघतात. ते हिमालयाचा प्रवास करतात. पांडवाबरोबर द्रौपदीही जाते. त्यांचा हा प्रवास चालू असताना द्रौपदीला भोवळ येऊन ती जमिनीवर पडते. यानंतर द्रौपदी व भीम

यांच्यामध्ये अखेरचा संवाद होतो. जीवन म्हणजे काय ते कसे जगले पाहिजे. जीवनाचे महत्व काय हे सर्व तत्वज्ञान ती सांगते. आणि शेवटी तिने डोळे मिटून घेतले. भीमाच्या चेहऱ्याची सावली तिच्या चेहऱ्यावरुन कधी दूर झाली हे तिला कळलेच नाही. तिचा श्वास मंदगतीने चालू होता आणि हळूहळू त्या श्वासातलि गती कमीकमी होत चालली होती एक, दोन, तीन अशा क्रमाने तिचा श्वास मंदावत मंदावत शेवटी एका क्षणाला तो बंद पडला. 'अयोनिजा 'तील द्रौपदीचा हा शेवट स्वाभाविक वाटतो.

या कादंबरीत काही दोषही आहेत द्रौपदीच्या जीवनावरील कादंबरी असूनही द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग यातून वगळलेला आहे. तसेच श्रीकृष्णाचे अप्रत्यक्ष असेच चित्रण येते. हे दोष असले तरी ही कादंबरी पुराणकालीन व्यक्तिमत्वाच्या मनातील भावभावना चैतन्यपूर्णतेने व्यक्त करण्यात यशस्वी झालेली आहे. ती पात्रे देखील लौकिक होती, साधी माणसे होती, आपणासारखेच त्याच्या मनात उदास अन क्षुद्र भावनांचे तांडव नाचत होते, याची कल्पना ही कादंबरी वाचल्यावर कोणालाही होईल.

वरील सर्व विवेचनावरुन असे म्हणता येईल की, योग्येसूद कथानक, ठळक व्यक्तिचित्रे, अंतर्मुख करणारे जीवनदर्शन, मनोभाव प्रकट करणारा संघर्ष, व्यक्तीव्यक्तीतील स्नेह, द्वेष आदी भावांनी गुंफलेले परस्परसंबंध, यथार्थ शीर्षक, आकर्षक प्रारंभ, शेवट ही या कादंबरीची वैशिष्टये आहेत.

## प्रकरण चौथे

### संदर्भ


१. वि. शो. पारगांवकर, - पुणे, 'अयोनिजा' पृ. १६४

२. तत्रैव - पृ. १६५

३. तत्रैव - पृ. १६६

४. तत्रैव - पृ. १६६

५. तत्रैव - पृ. १६९

६. तत्रैव - पृ. १७०

७. तत्रैव - पृ. १७०

८. तत्रैव - पृ. १७१

९. तत्रैव - पृ. १८९ - १९०

१०. तत्रैव - पृ. १९३

११. तत्रैव - पृ. २१०

१२. तत्रैव - पृ. २०८

१३. तत्रैव - पृ. १०२

१४. तत्रैव - पृ. १३१

१५. तत्रैव - पृ. ६२

१६. तत्रैव - पृ. ८१

१७. तत्रैव - पृ. ८४

१८. तत्रैव - पृ. ८५

१९. तत्रैव - पृ. १२९

२०. तत्रैव - पृ. ११

२१. तत्रैव - पृ. १२४

२२. तत्रैव - पृ. १२६

२३. तत्रैव - पृ. १८८

२४. तत्रैव – पृ. ६०
२५. तत्रैव – पृ. १८२
२६. तत्रैव – पृ. ६
२७. तत्रैव – पृ. २७
२८. तत्रैव – पृ. १०९ – ११०
२९. तत्रैव – पृ. २३
३०. तत्रैव – पृ. २४
३१. तत्रैव – पृ. २७
३२. तत्रैव – पृ. १३१
३३. तत्रैव – पृ. १३१
३४. तत्रैव – पृ. १३१
३५. तत्रैव – पृ. १३१
३६. तत्रैव – पृ. १८३
३७. तत्रैव – पृ. १८५
३८. तत्रैव – पृ. ८५
३९. तत्रैव – पृ. ८५
४०. तत्रैव – पृ. १२
४१. तत्रैव – पृ. ८५